दैनिक

# लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## राष्ट्रकुल स्पर्धेत भारताचा गोल्डन धमाका; एकाच शर्यतीत दोन पदके जिंकली

नवी दिल्ली दि.३० (वृत्तसंस्था)- कॉमनवेल्थ गेम्स २०२६ मध्ये भारतीय पॅरा ॲथलीट्स आणि खेळाडूंनी आपल्या चमकदार कामगिरीच्या जोरावर इतिहास रचला आहे. पुरुषांच्या १०० मीटर टी-४७ फायनल शर्यतीत भारताने एकाच वेळी सुवर्ण आणि रौप्य अशा दोन्ही पदकांवर आपले नाव कोरले. तर दुसरीकडे पुरुषांच्या लांब उडीत मुरली श्रीशंकरने रौप्य पदक पटकावले आहे.

पुरुषांच्या १०० मीटर टी-४७ फायनलमध्ये भारतीय धावपटूंनी अप्रतिम कौशल्याचे प्रदर्शन केले. शर्यतीदरम्यान दिलीप गावीत एका टप्प्यावर चौथ्या क्रमांकावर घसरला होता. मात्र, अखेरच्या काही सेकंदांत त्याने दाखवलेला जबरदस्त वेग सर्वांना थक्क करणारा ठरला. दिलीप गावीतने १०.७१ सेकंदाची वेळ नोंदवत थेट पहिले स्थान पटकावले आणि सुवर्ण पदक आपल्या नावे केले. याच शर्यतीत भारताच्या मोहम्मद बासिल एम यानेही उत्तम कामगिरी केली. त्याने १०.८३ सेकंदाच्या वेळेसह रौप्य पदक जिंकले. इंग्लंडच्या केविन सँटोसला मागे टाकत बासिलने दुसरे स्थान मिळवले.

दिलीप आणि बासिलच्या या ऐतिहासिक कामगिरीच्या काही मिनिटे आधीच पुरुषांच्या लांब उडी स्पर्धेत मुरली श्रीशंकरने भारतासाठी रौप्य पदक निश्चित केले. मुरलीने ८.०९ मीटरची सर्वोत्तम उडी मारत चौथ्या फेरीपर्यंत आघाडी टिकवून ठेवली होती. मात्र, जमैकाच्या टेजे गेलने ८.१५ मीटरची उडी मारून सुवर्ण पदकावर कब्जा केला. मुरलीला आपल्या पाचव्या प्रयत्नात ७.९४ मीटरची उडी मारता आल्याने त्याला अखेर रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.


(वर्ष ६५ वे अंक १९४) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.३१ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# विदर्भासह मराठवाड्याच्या काही जिल्ह्यात मुसळधार पाऊस, सिपना नदीला पूर

## गडचिरोली जिल्ह्यात अनेक नद्यांना पूर, अनेक गावांचा संपर्क तुटला

नागपूर/छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- मुंबई, पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात यंदा पावसाने दमदार हजेरी लावल्याचं दिसून आलं. शहरांमध्ये असलेल्या पावसामुळे धरणे भरली असून पिण्याच्या पाण्याची चिंता मिटल्याचं बोललं जातं. मात्र, अद्यापही शेतकरी पावसाची वाट पाहात असून मराठवाड्यातही हवा तेवढा पाऊस नसल्याने बळीराजा काळजीत आहे. मात्र, मराठवाड्यातील जालन्यात आज पावसाने दमदार हजेरी लावली. जिल्ह्यात आज सर्वदूर पावसाने दमदार हजेरी लावली असून हवामान विभागानेही रेड अलर्ट जारी केलाय. तर, विदर्भातही मुसळधार पाऊस सुरू असून काही नद्यांना पूर आल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

मराठवाड्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने घेतलेल्या विश्रांतीमुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली होती. मात्र, आज जालना जिल्ह्यातील जालना, बदनापूर, अंबड, मंठा आणि घनसावंगी तालुक्यांसह जिल्ह्यातील अनेक भागांत जोरदार पाऊस बरसला. या पावसामुळे पिकांना मोठा दिलासा मिळाला असून उघडीपामुळे आलेला ताणही कमी होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे, खरीप पिकांना नवसंजीवनी मिळण्याची आशा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. दुसरीकडे विदर्भातही ३० आणि ३१ जुलै रोजी मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्याच पार्श्वभूमीवर अमरावती, भंडारा आणि गडचिरोलीत जोरदार पाऊस सुरू आहे.

मराठवाड्यातील नांदेड, परभणी, हिंगोली जिल्ह्यात आज दमदार पाऊस झाला, तर विदर्भातील चंद्रपुर, भंडारा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, बुलढाणा या जिल्ह्यांना मुसळधार पावसाने झोडपुन काढले. आणखी दोन दिवस अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आलेला आहे.

अमरावती जिल्ह्याच्या मेळघाटातील धारणी तालुक्यात काल दिवसभर आणि रात्री मुसळधार पाऊस कोसळला. त्यामुळे नद्या आणि ओढ्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. येथील सिपना नदीला पूर आला असून, पाणी पुलावरून वाहत आहे. त्यामुळे २० ते २५ गावांचा मुख्यालयाशी संपर्क तुटला आहे. याशिवाय, पूर्णा प्रकल्पातील पाण्याची पातळी वाढल्यामुळे तीन दरवाजे २० सेंटीमीटरने उघडण्यात आले आहेत. त्यामुळे, शिरजगाव कसबा येथील मेघा नदीला अचानक पूर आला. त्यानंतर, प्रशासनाने नदीकिनारी



असलेल्या गावांना सतर्क केले आहे.

हवामान विभागानं आज भंडाऱ्याला ऑरेंज अलर्ट दिलेलं असताना सकाळपासून कडक ऊन निघालेले होते. मात्र, दुपारी अचानक वातावरणात बदल झाला. काळे ढग एकत्र आले आणि भंडारा जिल्ह्यात सर्वत्र मुसळधार पावसानं हजेरी लावली. तुमसरमध्ये तब्बल तासभर मुसळधार पावसाची धुमशान होती. तुमसरात मुसळधार पाऊस पडल्यानं अनेक सखलभागांमध्ये पावसाचं पाणी साचलं. सलग पाचव्या दिवशी भंडारा, तुमसर, मोहाडी, साकोली, लाखांदूर, लाखनी आणि पवनी तालुक्यातही या पावसानं जोरदार हजेरी लावली.

मुसळधार पावसामुळे गडचिरोलीच्या सिरोंचा तालुक्यातील कोटापल्ली पुलावरून पाणी वाहत असल्याने चार गावांचा तालुका मुख्यालयाशी संपर्क पूर्णपणे तुटला आहे. तर आल्लापल्ली शहरातील अनेक घरांमध्ये पाणी शिरले असून येथील पेट्रोल पंपालाही पाण्याने वेढा घातला आहे. दरम्यान पुरामुळे जिल्ह्यातील अनेक राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग आणि प्रमुख जिल्हा मार्ग पाण्याखाली गेल्याने वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. आज सकाळी ११ वाजेपर्यंत जिल्ह्यातील तब्बल १८ प्रमुख मार्ग पूरपाण्यामुळे बंद होते. गडचिरोली-धानोरा राष्ट्रीय महामार्गावरील रांगी नाला, आलापल्ली-सिरोंचा राष्ट्रीय महामार्गावरील मोसम आणि टेकमपल्ली नाले, तसेच आष्टी-आलापल्ली या राष्ट्रीय मार्गावरील दीना नदीसह अनेक ठिकाणी पाणी पुलांवरून वाहत आहे. एटापल्ली, अहेरी, मुलचेरा, धानोरा, कोरची, कुरखेडा, चामोर्शी आणि आरमोरी तालुक्यांतील अनेक मार्गही वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. दरम्यान प्रशासनाने नागरिकांना पूरग्रस्त मार्गांवरून प्रवास टाळण्याचे आवाहन केले असून प्रशासन परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहे.

# अमित शाह, तुमचे तोंड कोणी शिवलेय का?

## गृहमंत्र्यांच्या मौनावर मल्लिकार्जुन खरगेंचा हल्लाबोल

नवी दिल्ली दि.३० (वृत्तसंस्था)- पेपरफुटीविरोधी विधेयक राज्यसभेत मांडले जात असतानाच विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर तीव्र शब्दांत निशाणा साधला आहे. दिल्लीत आंदोलकांवर झालेल्या लाठीमारावर आणि पोलिसांच्या कारवाईवर गृहमंत्री मौन बाळगून का आहेत, असा संतप्त सवाल करत खरगे यांनी, ''गृहमंत्रीजी, तुमचं तोंड कोणी शिवलंय का?'' असा थेट प्रश्न राज्यसभेत विचारला. खरगे यांच्या या विधानावर सत्ताधाऱ्यांनी तीव्र आक्षेप घेतला असून सभागृहात मोठा गदारोळ पाहायला मिळाला.

कॉक्रोच जनता पार्टीच्या २० जुलै रोजी आयोजित 'चलो संसद' मोर्चादरम्यान पोलिसांनी केलेल्या लाठीचार्ज कारवाईचा मुद्दा खरगे यांनी लावून धरला. दिल्लीत विद्यार्थ्यांवर आणि आंदोलकांवर एवढी मोठी कारवाई होत असताना, देशाचे गृहमंत्री सभागृहात किंवा बाहेर यावर एक शब्दही बोलायला तयार नाहीत; यावरून काँग्रेसने शाह यांच्या अनुपस्थितीवर आणि मौनावर प्रश्न उपस्थित



केले आहेत.

जंतरमंतरवर आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलीस कारवाईचा तीव्र निषेध करताना खरगे म्हणाले, ''गावागावांतून आणि इतर राज्यांतून आलेल्या निष्पाप मुलांवर छर्रे (पेलेट गन) चालवले जात आहेत. यात एका विद्यार्थ्याचा डोळा गेला, कोणाचा कान तर कोणाचा हात निकामी झाला. या अमानुष कारवाईला जबाबदार कोण? गृहमंत्री अमित शाहच यासाठी जबाबदार आहेत.''

सभागृहातील भाजप नेत्यांनी खरगे यांच्या भाषेवर आक्षेप घेत ती 'असंसदीय' असल्याचे म्हटले. यावर स्पष्टीकरण देताना खरगे म्हणाले, ''मी कोणतीही असंसदीय भाषा वापरलेली नाही. मी बंद खोलीत बसलेल्या गृहमंत्र्यांना सांगू इच्छितो की, तुम्ही जास्त काळ लपून राहू शकत नाही. मी गृहमंत्र्यांना वैयक्तिकरित्या ओढून काढेन असे म्हटले नाही, तर देशातील 'जनशक्ती' म्हणजेच नागरिक, विद्यार्थी आणि महिला तुम्हाला बाहेर पडण्यास भाग पाडेल.''

दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही सोशल मीडिया प्लॅटफॉर्म '' वर पोस्ट करत अमित शाह यांच्या अनुपस्थितीवर टीका केली. गृहमंत्र्यांचे या मुद्द्यावरील मौन हे त्यांच्या 'गुन्हेगारीची आणि दोषाची कबुली' देण्यासारखे आहे, असा घणाघात राहुल गांधी यांनी केला. २० जुलै रोजी पोलिसांना गोळीबाराचे आदेश कोणी दिले, याचे स्पष्टीकरण गृहमंत्र्यांनी द्यावे, अशी मागणी काँग्रेस खासदारांकडून केली जात आहे.

लोकसभेत मंजूर झाल्यानंतर 'सार्वजनिक परीक्षा (अनुचित प्रकारांना प्रतिबंध) सुधारणा विधेयक २०२६' राज्यसभेत मांडण्यात आले. या विधेयकावर बोलताना खरगे यांनी सरकारवर जोरदार टीका केली. हे नवीन विधेयक म्हणजे केवळ जनतेच्या डोळ्यात धूळफेक असल्याचा आरोप त्यांनी केला.

## आंदोलकांवर कुठलीही कायदेशीर कारवाई होणार नाही, अटकेतील विद्यार्थ्यांची तातडीने सुटका; केंद्रीय गृहमंत्रालयाकडून आदेश जारी

नवी दिल्ली दि.३० (वृत्तसंस्था)- दिल्लीतील जंतरमंतरवर नीट पेपरफुटीप्रकरणी करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनावेळी आंदोलकांवर लाठीचार्ज करण्यात आला. यावेळी, पोलिसांनी बळाचा वापर करत विद्यार्थ्यांना मारहाण केली, लाठीचार्ज, अश्रूधुराच्या कांड्याही फोडल्या. त्यामुळे, येथे काही प्रमाणात हिंसाचार झाल्याचं देशानं पाहिलं. अखेर, आंदोलनकर्त्यांची मागणी मान्य करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पदाचा राजीनामा दिला. त्यानतंर, आंदोलन मागेही घेण्यात आले. मात्र, आंदोलक विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल झाले, काहींना ताब्यात घेण्यात आले, तर काहींना अटक झाली. आता, केंद्रीय गृहमंत्रालायने महत्त्वाचा आदेश जारी केला आहे. आंदोलकांवर कुठलीही कायदेशीर कारवाई होणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आलंय.

दिल्ली सरकारच्या गृह विभागाने परीक्षेतील कथित गैरप्रकारांविरोधात झालेल्या आंदोलनांसंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला असून, आंदोलकांविरोधात कोणतीही कठोर कायदेशीर कारवाई न करण्याचे स्पष्ट केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने २८ जुलै २०२६ रोजी शैलेंद्र मणी त्रिपाठी विरुद्ध भारत सरकार व इतर या प्रकरणात दिलेल्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर, सर्व बाबींचा साकल्याने विचार करून दिल्ली सरकारने हा निर्णय घेतला आहे.

दिल्ली सरकारच्या निर्णयानुसार, आंदोलनात सहभागी असलेल्या व्यक्तींविरोधात दिल्लीतील कोणत्याही पोलीसांकडून कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार नाही. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना हे संरक्षण लागू होणार नाही. या प्रकरणांत यापर्वी अटक/स्थानबद्धता झाली असल्यास, संबंधितांची सुटका करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू केली जाईल. आंदोलनात सहभागी व्यक्तींविरोधात यापुढे कोणतीही कारवाई प्रस्तावित नसून, हे प्रकरण कायमस्वरूपी बंद करण्यात येत आहे. दरम्यान, २९ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत, नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहारांच्या संदर्भात झालेल्या आंदोलनांशी संबंधित एकूण १३ गुन्ह्यांची नोंद दिल्ली पोलिसांनी केली होती. मात्र, आता हे गुन्हे मागे घेण्यात येणार आहेत. दिल्लीच्या उपराज्यपालांच्या मंजुरीने हा निर्णय जारी करण्यात आल्याची माहिती प्रेसनोटच्या माध्यमातून गृह विभागाच्या प्रधान सचिवांनी दिली.

## तुकाराम मुंढेंचे पथक थेट कोर्टाच्याच कँटिनमध्ये पोहोचले; नोंदच नसल्याचे उघड!

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)- अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या विभागाला मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयानं कारवाई संदर्भात प्रश्न विचारले होते. सरकारी आस्थापनांमधील उपहारगृहांसंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने एफडीएला प्रश्न विचारताच एफडीएचं पथक आज उच्च न्यायालयात दाखल झालं. मुंबई उच्च न्यायालयाच्या आवारातील उपहारगृहांची तपासणी एफडीएकडून सुरू करण्यात आली.

अन्न व औषध प्रशासनाकडून केलेल्या तपासणी दरम्यान उच्च न्यायालयातील एका उपहारगृहाची नोंदणीच झाली नसल्याचं स्पष्ट झालं. नियमानुसार नोंदणी नसलेल्या उपहारगृहांवर दंडात्मक कारवाईची तरतूद आहे. अन्न व औषध प्रशासनानं मुंबई उच्च न्यायालयाच्या परिसरातील कँटिंनची तपासणी केल्यानं या कारवाईची चर्चा रंगली आहे.

मुंबई हायकोर्टानं मंगळावरी झालेल्या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयाने खाजगी आस्थापनांवर कारवाईचा धडाका लावणाऱ्या अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाई पद्धतीवरच प्रश्चिन्ह उपस्थित केले होते. आजवर किती मंत्रांच्या आणि सरकारी आस्थापनांवर छापे टाकले अशी (पान ४ वर)

## शिवसेना पक्ष अन् चिन्हाबाबत पुढील सुनावणी ४ ऑगस्टला

नवी दिल्ली दि.३० (वृत्तसंस्था)- शिवसेना पक्ष, निवडणूक चिन्ह आणि आमदारांच्या अपात्रतेच्या अत्यंत संवेदनशील मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात आज (३० जुलै) प्रत्यक्ष सुनावणी पार पडली. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या तीन न्यायमूर्तींच्या पीठासमोर ही सुनावणी झाली. न्यायालयाने दोन्ही बाजूंना आवश्यक कागदपत्रांचे संकलन सादर करण्याचे निर्देश दिले असून, या प्रकरणाची पुढील सुनावणी येत्या ४ ऑगस्ट रोजी निश्चित करण्यात आली आहे.

सुनावणी दरम्यान ठाकरे गटाची बाजू मांडताना ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला. त्यांनी सुरुवातीला आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर भर दिला. सिब्बल यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, ''१९६६ मध्ये स्थापन झालेल्या शिवसेनेचे २०१३ पासून उद्धव ठाकरे हेच अधिकृत पक्षप्रमुख आहेत. २०१८ मध्ये झालेल्या पक्षांतर्गत निवडणुकांचे सर्व पुरावे कोर्टाला सादर करण्यात आले आहेत. इतकेच नव्हे, तर एकनाथ शिंदे यांची २०१८ मध्ये गटनेतेपदी नियुक्ती खुद्द उद्धव ठाकरे यांनीच केली होती.'' एका चिन्हावर निवडून यायचे, त्यानंतर बंडखोरी करायची आणि मूळ पक्षावरच दावा सांगायचा, हा प्रकार प्रातिनिधिक लोकशाहीवर मोठा आघात असल्याचे सिब्बल यांनी नमूद केले. तसेच सुभाष देसाई प्रकरणाचा दाखला देत त्यांनी स्पष्ट केले की, केवळ आमदारांचे संख्याबळ जास्त आहे म्हणून विधिमंडळ पक्षाला मूळ राजकीय पक्ष मानता येत नाही.

युक्तिवादादरम्यान सिब्बल यांनी केंद्रीय निवडणूक आयोग आणि महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयांवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. निवडणूक आयोगाने पक्षाची २०१८ ची सुधारित घटना विचारात न घेता केवळ आमदारांच्या संख्याबळाच्या आधारे शिंदे गटाला पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह दिले, जो निर्णय पूर्णपणे चुकीचा आहे, असा युक्तिवाद ठाकरे (पान ४ वर)

## राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांच्या सिबिलवर कर्जमाफीची टांगती तलवार:सरकारने तातडीने बँकांना स्पष्ट निर्देश द्यावे, क्रांतिकारी शेतकरी संघटनेची मागणी

हिंगोली दि.३० (प्रतिनिधी)- राज्य सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजने अंतर्गत शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत पीक कर्जमाफी देण्याची घोषणा केली होती. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीत कर्जफेडीची काही रक्कमच सरकार भरणार असून उर्वरित रक्कम संबंधित बँकांनी माफ करायची असल्याने ही प्रक्रिया वन टाइम सेटलमेंट पद्धतीने राबविण्यात येत आहे. त्यातून शेतकऱ्यांच्या सीबीलवर कर्जमाफीची टांगती तलवार येणार असल्याचा आरोप क्रांतिकारी शेतकरी संघटनेने केला आहे.

या संदर्भात क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे, जिल्हाध्यक्ष नामदेव पतंगे यांनी संगितले की, राज्यात शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना जाहिर केली. यामध्ये सरकारने कर्जमाफीची घोषणा करून शेतकऱ्यांना दिलासा दिला असला तरी कर्जफेडीची काही रक्कमच सरकार भरणार असून उर्वरित रक्कम संबंधित बँकांनी माफ करायची असल्याने ही प्रक्रिया वन टाइम सेटलमेंट पद्धतीने राबविण्यात येत आहे. कर्जाची नोंद वन टाइम सेटलमेंट म्हणून झाल्यास भविष्यात शेतकऱ्यांना पीक कर्ज, वाहन कर्ज, गृहकर्ज किंवा इतर बँकिंग सुविधा मिळविताना (पान ४ वर)

## पेलेट गनच्या वापरावर पूर्णपणे बंदी घालता येणार नाही, सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा; केंद्र सरकारलाही नोटीस बजावली

नवी दिल्ली दि.३० (वृत्तसंस्था)- दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलक विद्यार्थ्यांवर करण्यात आलेल्या लाठीचार्ज आणि पॅलेट गनच्या कारवाईवरून राज्यासह देशाचं वातावरण तापलं आहे. असे असताना आज (गुरुवारी, ३० जुलै) सर्वोच्च न्यायालयाने पेलेट गनच्या वापरासाठीच्या एसओपी (मानक कार्यप्रणाली) संदर्भात केंद्र सरकारकडून उत्तर मागवलय. न्यायालयाने सूचित केले की, पेलेट गनच्या वापरावर संपूर्ण बंदी घातली जाणार नाही, मात्र मानक कार्यप्रणालीचा विचार केला जाईल. गुरुवारी, सर्वोच्च न्यायालयाने गर्दीवर पेलेट गनच्या वापरावर बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी घेतली.

सुनावणीदरम्यान, वकील वृंदा ग्रोव्हर यांनी युक्तिवाद केला की, रबरी नव्हे, तर धातूच्या गोळ्या वापरल्या गेल्या. धातूच्या गोळ्यांचा हा वापर थांबवला पाहिजे. यावर सर्वोच्च न्यायालयाने उत्तर दिले की, आम्ही या प्रकरणावर विचार करण्यास नकार देत नाही आहोत, परंतु एक योग्य याचिका दाखल केली पाहिजे. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी असेही सांगितले की, ते एक कार्यप्रणाली तयार करण्याची योजना आखत असल्याचे सांगितलं. दरम्यान, या संदर्भातील याचिका इंटेलिजन्स ब्युरोचे माजी विशेष संचालक यशोवर्धन आझाद आणि २० जुलै रोजी दिल्लीतील जंतर-मंतर येथील आंदोलनादरम्यान पोलिसांच्या कारवाईत पेलेट गनच्या माऱ्यामुळे जखमी झालेल्या दोन व्यक्तींनी दाखल केली होती.

सुनावणीदरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना त्यांच्या याचिकेत सुधारणा करण्यास सांगितले. सध्याच्या याचिकेत पेलेट गन्सच्या वापरावर पूर्ण बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे. न्यायालयाने याचिकेत योग्य बदल करण्याचे संकेत दिले आणि त्याच वेळी कायदा अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांकडून पेलेट गन्सच्या वापराबाबतची प्रमाणित कार्यपद्धती रेकॉर्डवर सादर करण्याचे निर्देश केंद्राला दिले. आता सरकारचे उत्तर दाखल झाल्यानंतरच या प्रकरणाची पुढील कार्यवाही होईल.

कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थितीत गर्दी पांगवण्यासाठी कायदा अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांकडून वापरल्या जाणाऱ्या पेलेट गन्सचा वापर बंद करण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली आहे. शांततापूर्ण निदर्शकांविरुद्ध पेलेट गन्सचा वापर करणे हे मुळातच अवाजवी आणि घटनाबाह्य असल्याचे यात म्हटले आहे. याचिकेनुसार, अहिंसक जमावाला पांगवण्यासाठी अशा शस्त्रांचा वापर करणे हे वाजवीपणाच्या कसोटीवर उतरत नाही आणि घटनात्मक संरक्षणाचे उल्लंघन करते. गर्दीच्या व्यवस्थापनासाठी कमी हानिकारक पर्यायांचा अवलंब केला जावा, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी केला आहे.

## अमित शहांनी राजीनामा द्यावा; विद्यार्थ्यांवरील कारवाईवरून संजय राऊत आक्रमक

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)- शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी आज पत्रकार परिषदेत भारतीय जनता पक्ष आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर सडकून टीका केली. विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर करण्यात आलेल्या कारवाईचा तीव्र निषेध करत राऊत यांनी अमित शहा यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. तसेच, शहांच्या आगामी पुणे दौऱ्याला पुणेकरांनी कडाडून विरोध करण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान पॅलेट गन्सचा वापर करण्यात आल्याचा गंभीर आरोप संजय राऊत यांनी केला आहे. या कारवाईवर संताप व्यक्त करताना ते म्हणाले की, ''विद्यार्थ्यांवर गोळीबाराचे आदेश दिले असोत किंवा नसोत, या दडपशाहीला थेट गृहमंत्री अमित शहा हेच जबाबदार आणि दोषी आहेत. त्यामुळे त्यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यायला हवा.''

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे पुण्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या पार्श्वभूमीवर राऊत यांनी आक्रमक भूमिका घेत पुणेकरांना आवाहन केले आहे. अमित शहा जर पुण्यात येत असतील, तर अख्ख्या पुणेकरांनी त्यांना तीव्र विरोध केला पाहिजे,'' असे आवाहन राऊत (पान ४ वर)

## इंधन अन् खतांसंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मंत्र्यांना महत्त्वाचे निर्देश

नवी दिल्ली दि.३० (वृत्तसंस्था)- पश्चिम आशियातील तणाव आणि 'होर्मुझ सामुद्रधुनी' परिसरातील बिघडलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार ॲक्शन मोडवर आले आहे. या गंभीर मुद्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्येष्ठ मंत्री तथा वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैठकीत देशाची ऊर्जा सुरक्षा, खतांची उपलब्धता, भारतीय खलाशांची सुरक्षा तसेच निर्यातीवर होणारा परिणाम आदी विषयांवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी, कुठल्याही परिस्थितीत, सर्वसामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांना त्रास होऊ नये, असे निर्देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले आहे.

जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात काम करणाऱ्या प्रत्येक भारतीय खलाशाची सुरक्षितता, हे सरकारचे सर्वोच्च प्राधान्य आहे. मग तो खलाशी भारतीय जहाजावर असो अथवा परदेशी जहाजांवर, आवश्यकतेनुसार, सरकार त्यांना सर्वतोपरी मदत करेल, असे पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट केले.

होर्मुझ सामुद्रधुनीतील संकटाचा सर्वाधिक परिणाम, कच्च्या तेलाच्या आणि वायूच्या पुरवठ्यावर होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, कच्च्या तेलाची पुरवठा साखळी बाधित होऊ नये, यासाठी पेट्रोलियम मंत्रालयाच्या तयारीचा आढावा घेतला. देशात पीएनजीचा वापर वेगाने वाढवण्यावर चर्चा करण्यात आली. यावर भर देण्यात आला. याशिवाय, आगामी रबी हंगामासाठी देशात पुरेसा खतसाठा उपलब्ध असून, २०२७ च्या खरीप हंगामासाठीही खतांचा राखीव साठा तयार करण्याचे काम सुरू असल्याचे सांगण्यात आले.

याशिवाय, निर्यातीवर होणाऱ्या परिणामांचे आकलन करून, व्यापाऱ्यांना दिलासा देण्यासंदर्भातही चर्चा यावेळी चर्चा करण्यात आली. तसेच, देशाच्या अर्थव्यवस्थेवरील परिणामाचेही मूल्यांकन या बैठकीत करण्यात आले

## अमेरिका-इराण युद्धात प्रथमच इजिप्तवर हल्ला

वॉशिंग्टन दि.३० (वृत्तसंस्था)- इराण आणि अमेरिका यांच्यातील सुरू असलेला संघर्ष आता इजिप्तपर्यंत पोहोचला आहे. 'द न्यूयॉर्क टाइम्स'च्या वृत्तानुसार, इजिप्त सरकारने गुरुवारी सांगितले की, बुधवारी डॅमिएटा बंदरावर दोन गॅस टँकर्सना लागलेली आग ही अपघाताचा परिणाम नसून तो एका 'ड्रोन' हल्ल्याचा परिणाम होता.

मिळालेल्या माहितीनुसार, या ड्रोनने 'एनर्गोस विंटर' या अमेरिकन कंपनीच्या मालकीच्या नैसर्गिक वायू साठवणूक करणाऱ्या टँकरला लक्ष्य केले होते. या हल्ल्यामुळे आग शेजारीच उभ्या असलेल्या 'गॅस-लॉग सालेम' या दुसऱ्या टँकरपर्यंत पसरली. अग्निशमन दलाच्या पथकांनी ही आग त्वरित आटोक्यात आणली आणि यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. या हल्ल्यामागे इराणचा हात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

दोन इराणी सूत्रांचा हवाला देत 'द न्यूयॉर्क टाइम्स'ने वृत्त दिले आहे की, हा हल्ला एक संदेश देण्यासाठी करण्यात आला होता: जर हा संघर्ष अधिक तीव्र झाला, तर जागतिक सागरी वाहतूक आणि ऊर्जा पुरवठ्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात.

## नवे शिक्षणमंत्रीही विचित्रच, जे बलात्काऱ्यांचे समर्थन करतात; अभिजित दिपकेंचा संताप

छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- विद्यार्थी आंदोलनाचे नेतृत्व करणारे अभिजित दिपके यांनी छत्रपती संभाजीनगर येथील निवासस्थानी पत्रकार परिषद घेत केंद्र सरकार, भाजप आणि पोलिस प्रशासनावर गंभीर आरोप केले. विद्यार्थ्यांवरील लाठीमार, दगडफेक आणि पोलिसांच्या कारवाईबाबत पूर्वनियोजन करण्यात आल्याचा दावा करत त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली. रामदेव बाबा यांच्यावरही दिपके यांनी निशाणा साधला.

अभिजीत दिपके म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांचा फोटो घेऊन चालणे, जय भीमचे नारे देणे आणि लोकशाहीसाठी रस्त्यावर उतरणे म्हणजे जर संस्कृती बदनाम करणे असेल, तर रामदेव बाबांना सांगा की होय, आम्ही संस्कृती बदनाम करतोय, ते म्हणाले, रामदेव बाबांनी आमच्यावर बोलण्यापेक्षा त्यांच्या पतंजलीच्या उत्पादनांवर लक्ष द्यावे.

सर्वोच्च न्यायालयानेही त्यांच्या उत्पादनांवरून फसवणूक होत असल्याचे म्हटले आहे. देश आणि संस्कृती आम्ही झेन झी पिढी सांभाळून घेऊ, तुम्ही तुमच्या उत्पादनांकडे लक्ष द्या, नाहीतर ती बंद पडतील. तसेच, इथून पुढे शेतकरी आणि त्यांच्या नेत्यांना जेव्हा गरज पडेल, तेव्हा आम्ही त्यांच्या पाठीशी उभे राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

केंद्र सरकार आणि नव्या शिक्षणमंत्र्यांवरही दीपकेंनी नाराजी व्यक्त केली. देशाचे शिक्षणमंत्री आता बलात्काऱ्यांचे (पान ४ वर)

# चवीच्या मोहात आरोग्याचा विसर

आजकाल घराबाहेर पडले, की प्रत्येक चौकात खाद्यपदार्थांचा वास जिभेला भुरळ पाडतो. मग ते तळलेले वडापाव, चटकदार पाणीपुरी, रंगीबेरंगी ज्यूस, आकर्षक मिठाया, चमचमीत बिर्याणी, मसालेदार चायनीज असो की गरमागरम समोसे... चव जिभेवर रेंगाळते आणि आपण क्षणाचाही विचार न करता ते पदार्थ खायला जातो. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या फूड व्हिडीओंनी तर या सवयीला अधिक खतपाणी घातले आहे. पण या चमचमीत पदार्थांच्या मागे लपलेले वास्तव मात्र अंगावर काटा आणणारे आहे. आज महाराष्ट्रात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेल्या धडक कारवायांमुळे हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. राज्यभरात बनावट तूप, कृत्रिम पनीर, भेसळयुक्त मसाले, निकृष्ट तेल, कालबाह्य अन्नपदार्थ, दूषित मिठाई आणि दूध यावर सातत्याने धाडी टाकल्या जात आहेत. अनेक कारखाने सील करण्यात आले, परवाने रद्द झाले, गुन्हे दाखल झाले. या कारवायांनी एक गोष्ट स्पष्ट केली, आपल्या ताटापर्यंत पोहोचणाऱ्या अन्नाचा प्रवास जितका मोठा, तितकाच त्यात भेसळीचा धोका अधिक.

याच पार्श्वभूमीवर अभिनेता श्रेयस तळपडे यांची 'द इंडिया स्टोरी' या चित्रपटाच्या निमित्ताने दिलेली मुलाखत अत्यंत बोलकी आहे. त्यांनी या मुलाखतीत एक प्रश्न विचारला, तुमच्या थाळीतील अन्न खरोखरच सुरक्षित आहे का? हा प्रश्न केवळ चित्रपटाचा प्रचार नाही, तर समाजाला जागे करणारा इशारा आहे. श्रेयस तळपदे सांगतो की, या चित्रपटाची पटकथा वाचल्यानंतर थोडा धक्काच बसला. अन्नभेसळीमुळे लोकांचे जीव जाऊ शकतात, कर्करोगासारखे गंभीर आजार होऊ शकतात, हे समजल्यावर त्यांनी हा चित्रपट करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी स्पष्टपणे म्हटले की, आज घरचे अन्न खा, असे आपण म्हणतो; पण घरात येणारे तांदूळ, डाळी, तेल, दूध आणि मसालेच भेसळयुक्त असतील, तर घरचे अन्नही किती सुरक्षित आहे? हा प्रश्न प्रत्येक कुटुंबाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. श्रेयस तळपदे यांनी आणखी एक मुद्दा मांडला तो म्हणजे, आज ऑर्गॅनिक किंवा सेंद्रिय अन्नाच्या नावाखाली महागडी उत्पादने विकली जात आहेत. पण ती सामान्य माणसाच्या आवाक्यात आहेत का? जर सुरक्षित अन्न खाण्यासाठी जास्त पैसे मोजावे लागत असतील, तर गरीब आणि मध्यमवर्गीयांनी काय करावे? सुरक्षित अन्न हा श्रीमंतांचा विशेषाधिकार नसून प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे. आज परिस्थिती अशी आहे की, बाजारात मिळणाऱ्या प्रत्येक वस्तूकडे संशयाने पाहावे लागते. दूध भेसळयुक्त तर नाही ना? तूप शुद्ध आहे का? मिठाईतील रंग आरोग्यास अपायकारक तर नाहीत? फळे कृत्रिमरीत्या पिकवली आहेत का? भाज्यांवर धोकादायक रसायनांचा मारा झाला आहे का? या प्रश्नांची उत्तरे सामान्य ग्राहकाकडे नसतात. अलीकडे आपल्या वाचनात अन्नभेसळ केलेल्या अनेक बातम्या समोर येत आहेत. प्रसिद्ध हॉटेलांमधील अन्नात अळ्या किंवा पाली आढळणे, ताकात माशी, मिठायांमध्ये किडे दिसणे, फ्रीजमध्ये कुजलेले मांस सापडणे, भाजीपाला डबक्यात धुणे, रस्त्यावरील खाद्यपदार्थांसाठी अत्यंत अस्वच्छ पाण्याचा वापर होत असल्याचे उघड झाले. यामध्ये केवळ विक्रेत्यांची चूक नाही. तर ग्राहक म्हणून आपणही अनेकदा निष्काळजीपणा करतो. स्वस्तात मिळते, चविष्ट वाटते म्हणून किंवा सोशल मीडियावर प्रसिद्ध आहे म्हणून आपण कोणत्याही ठिकाणी खायला जातो. स्वच्छता, परवाना, अन्नाचा दर्जा, वापरलेले तेल, साठवणूक याचा विचार फार कमी लोक करतात.

दरम्यान, उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल यांनी केलेले एक विधानही विचार करायला लावणारे आहे. त्यांनी काही वसतिगृहांच्या पाहणीत विद्यार्थी जेवणासोबत ड्रग्ज आणि मद्यही मागवत असल्याचा दावा केला. या विधानावर राजकीय वाद झाला; परंतु त्या विधानामागील मूळ संदेश वेगळा आहे. आजच्या तरुणांच्या खाण्याच्या सवयी झपाट्याने बदलत आहेत. पोषक आहारापेक्षा फास्टफफूड, प्रक्रिया केलेले पदार्थ, ऊर्जा पेये आणि व्यसनांकडे झुकणारी जीवनशैली वाढत आहे. त्यातच भेसळयुक्त अन्नाची भर पडली, तर पुढील पिढीच्या आरोग्याचे चित्र किती भयावह असेल, याची कल्पनाही करवत नाही. अन्नभेसळ ही केवळ ग्राहकांची फसवणूक नाही; तर नफा कमावण्यासाठी एखादा व्यापारी हजारो लोकांच्या आरोग्याशी खेळत असेल, तर त्याला केवळ दंड करून चालणार नाही. तुकाराम मुंढे यांच्यासारखे अधिकारी कारवाई करत आहेत, ही निश्चितच समाधानाची बाब आहे; पण ही मोहीम एखाद्या अधिकाऱ्यावर अवलंबून राहता कामा नये. ती संपूर्ण व्यवस्थेची जबाबदारी बनली पाहिजे. यासाठी सरकारने प्रत्येक जिल्ह्यात आधुनिक अन्न तपासणी प्रयोगशाळा उभारणे, नियमित तपासण्या करणे, दोषींवर कारवाई करणे आणि ग्राहकांना तक्रार नोंदविण्याची सुलभ व्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर शाळा, महाविद्यालये आणि समाजमाध्यमांतून सुरक्षित अन्नाविषयी जनजागृतीही तितकीच महत्त्वाची आहे; परंतु शेवटी एक प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा, आपण आपल्या मुलांच्या हातात नेमके काय देत आहोत? त्यांच्या डब्यात पोषण आहे की रसायने? त्यांच्या आवडत्या चिप्समध्ये चव आहे की आरोग्याचा ऱ्हास? आपण बाहेरून आणलेला प्रत्येक घास त्यांच्या भविष्यातील आजारांचे कारण ठरत नाही तर ना? आज गरज आहे ती केवळ भेसळखोरांविरोधात कारवाईची नाही, तर चवीपेक्षा आरोग्याची निवड करणाऱ्या समाजाची. कारण आपल्या ताटातील प्रत्येक घास सुरक्षित असेल, तरच आपल्या कुटुंबाचे, समाजाचे आणि देशाचे भविष्य निरोगी राहील.

# जेन झी चा वणवा

**सर्वोच्च** न्यायालयाच्या सरन्यायाधिशांनी बेरोजगार आणि अहोरात्र सोशल मिडियावर पडललेल्या तरूणांना झुरळं म्हणून संबोधल्यावर अमेरिकेत बोस्टनमधे शिकत असलेल्या अभिजीत दीपकेने कॉक्रोच जनता पार्टीची घोषणा केली. इंस्टाग्रामवर अभिजीतच्या घोषणेला देशातून तरूणाईचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. अडिच कोटी फॉलोअर्स भेटले. नीट परीक्षा पेपर फुटीची जबाबदारी स्वीकारून धर्मेंद्र प्रधान यांना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा, अशी अभिजीतने थेट मागणी केली. बावीस लाख विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना प्रचंड मानसिक त्रास झाला, नैराश्यातून २४ मुलांनी आत्महत्या केल्या, गेल्या दहा वर्षात १५२ पेपर फुटीच्या घटना घडल्या. त्याचे उत्तरदायित्व कोण स्वीकारणार ? असा थेट प्रश्न त्यांनी सरकारला विचारला. कोणतेही संघटन नसलेली आणि सोशल मिडियावर स्थापन झालेली पार्टी काय करू शकणार, अशा भ्रमात मोदी सरकार होते. सरकारमधे मंत्री म्हणून कोणाला ठेवायचे व कोणाला हटवायचे हे तुम्ही कोण सांगणार, अशी मानसिकता सत्ताधाऱ्यांमधे दिसून आली. जंतरमंतरवर आंदोलन चालू असताना कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाची भाजपाने यथेच्छ टिंगल टवाळी केली. मोदी सरकार सत्तेवरून उलथवायला निघालेत, त्यांना देशात अराजक माजवायचे आहे, आंदोलनात गुंड व दहशतवादी घुसले आहेत, पाकिस्तानमधून त्यांना रसद पुरवली जात आहे, आंदोलनामागे चीन व अमेरिकेचा हात आहे अशा वाट्टेल त्या कंड्या सत्ताधारी पक्षातून आणि गोदी मिडियातून पिकवल्या गेल्या. जंतरमंतरवरील आंदोलन बदनाम करण्याचा, भरपूर प्रयत्न झाला. लडाखचे नेते सोनम वांगचूक यांना भल्या पहाटे पांढऱ्या चादरीत गुंडाळून उचलून नेण्यात आले. संसद भवनवर मोर्चा काढणाऱ्या मुला मुलींना खिळे ठोकलेल्या लाठ्यांनी बदडण्यात आले. साध्या वेशातील पोलिसांनी आंदोलकांवर बेछूट लाठीमार केला. गणवेशातील पोलिसांनी मुलांच्या मोर्चावर अश्रुधूराच्या नळकांड्या फोडल्या. मुलींचे कपडे फाडले, त्यांचे विनयभंग झाले. परस्परांवर दगडफफेक झाली. जंतरमंतर भोवती व संसद मार्गावर लावलेल्या बॅरीकेटसमध्ये वीजेचे करंट सोडण्यात आले. जंतरमंतरवर जेवण- खाणाची रसद तोडण्याचा प्रयत्न झाला. हॉटेल व रेस्टॉरंट मालकांना धमकविण्यात आले. जंतरमंतर व संसद भवनकडे येणारे रस्ते बंद केले गेले. अठरा मेट्रो स्टेशन्स बंद ठेवली. आंदोलकांचा कोणाशीही संवाद होऊ नये म्हणून इंटरनेट सेवा खंडीत करण्यात आली. पंधरा ते पंचवीस वयोगटातील विद्यार्थी हे जणू देशद्रोही आहेत, असे चित्र रंगविण्याचा प्रयत्न झाला. दिल्ली पोलिसांनी आंदोलकांवर केलेल्या निर्घृण लाठीहल्ल्यानंतर संपूर्ण देशभरात सरकारच्या विरोधात संतापाची लाट निर्माण झाली. देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो युवक व विद्यार्थांचे जथेच्या जथे मिळेल त्या मार्गाने व मिळेल त्या वाहनाने दिल्लीला निघाले. चलो संसद मोर्चात तर एक लाखावर युवक सामील झाले. संपूर्ण देशात सरकार विरोधात उस्फूर्त जनआंदोलन उभे राहीले. दिल्ली, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगरसह देशातील दिडशे शहरात तरूणाई हजारोंच्या संख्येने भाजपा सरकारचा धिक्कार करण्यासाठी रस्त्यावर उतरली. कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलकांनी दाखवलेली हिम्मत, ताकद आणि देशभर पेटलेला असंतोषाचा वणवा यामुळे ३६ दिवसानंतर मोदी सरकारचा अहंकार गळून पडला. जेन झीपुढे सरकारला झुकावे लागले, धर्मेंद्र प्रधानांना शिक्षणमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. युवाशक्तिची अभेद्य एकजूट व देशभरात झालेले शक्तिप्रदर्शन यापुढे सरकारला नमावे लागले. गेल्या बारा वर्षात मोदी सरकारवर प्रथमच एवढी नामुष्की आली. कोटी कोटी उधळून सत्ता मिळवली, खोकी देऊन विरोधी पक्षात तोडफफोड केली, इडी, सीबीआय, इनकम ट'क्ससारख्या यंत्रणा वापरून विरोधी पक्षाचा आवाज दाबला, सतत इव्हेंट व मार्केटींग करून स्वत:ची प्रतिमा उजळिवण्याचे काम केले, त्यावर जेन झीच्या आंदोलनाने पाणी ओतले. तुम्ही देशाचे सेवक आहात, हुकूमशहा नाही, असा संदेश या आंदोलनाने सरकारला दिला आहे.

दिल्ली पोलिसांनी विद्यार्थी- विद्यार्थिनींवर आमानुष लाठीमार केला, अनेकांची डोकी फुटली, चेहरे रक्तबंबाळ झाले, पाठी, कंबर सुजली, शरीरावर जखमा झाल्या, त्याला कोण जबाबदार आहे. दिल्ली पोलीस हे केंद्रीय गृहमंत्रालयाच्या अखत्यारीत आहे. केंद्र सरकारला त्याची जबाबदारी झटकटा येणार नाही. कोवळ्या मुलांच्या मोर्चावर लाठीमार करताना थेट खिळे ठोकलेल्या लाठया का वापरल्या ? पाण्याचे फवारे का सोडले नाहीत ? पेलेट गन्सचा वापर करायचा आदेश कोणी दिला ? साध्या वेशातील पोलीसांना मुलांवर लाठ्या चालविण्याचे अधिकार कोणी दिले ? अनेक पोलिसांच्या गणवेषावर नावाची पट्टीच नव्हती , हे कशासाठी ? ज्या पोलिसांनी मुलींचे कपडे फाडले व त्यांच्या श्रीमुखात लगावली त्यांच्यावर कारवाई काय होणार ? आंदोलकांना पांगविण्यासाठी किती व कुठे- कुठे अश्रुधूराच्या नळकांड्या फोडल्या ? पोलिसांच्या क्रूर कारवाईची न्यायालयीन चौकशी होईल का ?

वीस जून रोजी कॉक्रोच जनता पार्टीने शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी जंतरमंतरवर आंदोलन सुरू केले. या आंदोलनाला दिल्लीतून व देशातून अभूतपूर्व प्रतिसाद मिळेल अशी सरकारला कल्पना नव्हती. आंदोलकांच्या हाती केवळ संविधान, बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो व तिरंगा ध्वज होता. याच मैदानात सोनम वांगचूक यांनी २८ जूनला उपोषण सुरू केल्याने जेन झी आंदोलनाला नैतिक बळ प्राप्त झाले. उपोषणाने सोनम यांची प्रकृती खालावू लागली व जंतरमंतरकडे गर्दीचा ओघ वाढू लागला. काँग्रेस, आप, उबाठा सेना, राष्ट्रवादी काँग्रेस (शप), सपा, आदी विरोधी पक्षांचे नेते येऊ लागले. नंतर चित्रपट सृष्टीतील कलाकारांची रांग लागली. शरद पवार, उध्दव ठाकरे, सुप्रिया सुळे, अरविंद केजरीवाल, मुख्यमंत्री थलपती विजय, मेहबुबा मुफ्ती, डिम्पल यादव असे असंख्य नेते आंदोलकांना पाठिंबा देण्यासाठी आले. ब्रिटन, जर्मनी, नेदरलँड, आयर्लंड. फ्रान्स, कॅनडा, अमेरिका आदी देशात भारतीय विद्यार्थी रस्त्यावर उतरले. विदेशातील मिडियामधेही भारतातील जेन झी आंदोलनाला मोठी प्रसिध्दी मिळू लागली. आंदोलन हे कॉक्रोच जनता पार्टीच्या कक्षेबाहेर गेले. सरकारविरोधात सर्वत्र उग्र प्रदर्शन सुरू झाले. राहुल गांधींनी थेट पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर आंदोलन केले व शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची व मोदी - शहा यांच्या माफीनाम्याची मागणी चालू ठेवली. सोनम वांगचूक यांचे उपोषण मध्यरात्री का सोडविण्यात आले? त्यांचे उपोषण सोडवायला दोन मंत्री इस्पितळात का गेले ? पंतप्रधानांनी व्हिडिओवरून युवापिढीविषयी आपणास खूप चिंता वाटते हे मध्यरात्रीनंतर का सांगावे ? वांगचूक यांच्या पत्नीने राहुल गांधींनी पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर आंदोलन करायला नको होते हे सांगण्याची गरज काय ? सोनम वांगचूक व दीपके यांच्यात मतभेद व्हावेत व अंतर पडावे यासाठी सरकारने काळजी पूर्वक प्रयत्न केले. भाजपाशी संलग्न असलेल्या विद्यार्थी संघटनांची मदत घेऊन आंदोलनात फूट पाडता येईल का. असाही प्रयत्न झाला. आंदोलक मुले- मुली सुशिक्षित होत्या, त्यांचे आई वडिल, आजी आजोबाही त्यांना पाठिंबा देण्यासाठी जंतरमंतरवर आले होते . त्यांच्या घोषणा , पोस्टर्स कल्पक होती. सोशल मिडयाचा वापर करण्यात सारे माहिर होते. ज्या पोलिसांनी लाठ्या मारल्या, त्यांचे दुसऱ्या दिवशी त्यांनी टाळ्या वाजवून स्वागत केले.

आम्ही एका मंत्र्याच्या राजीनाम्यानंतर थांबणार नाही, पोलिसांचाही हिशेब केला जाईल असे क्रॉक्रोच जनता पार्टीने जाहीर केले आहे. अमानुष वागणूक देणाऱ्या पोलिसांचे व्हिडिओ पुरावे म्हणून तयार ठेवले आहेत. पेपर फुटीनंतर ज्या मुलांनी आत्महत्या केल्या, त्यांच्या परिवाराला एक कोटी नुकसान भरापाई देण्याचे आश्वासन सरकारने दिले आहे.

आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचे सरकारने कबुल केले आहे. गेल्या बारा वर्षात विरोधी पक्षांना जमले नाही ते जेन झी ने करून दाखवले. पोलीस, इडी, सीबीआयला आम्ही घाबरत नाही, हे दाखवून दिले. झुरळांचा वणवा सत्ताधाऱ्यांच्या खुर्चीपर्यंत पोचू शकतो हे दिसले. अभिजीत दिपके याने म्हटले आहे- लोकशाहीची पहाट झाली आहे. देशातील जनता जागी झाली आहे. ये तो पहिला विकेट है, यहीं नहीं रूकेंगे, अभी तो बस शुरूवात हुई है:.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

# 'जेन-झी जनरेशन गटार आहे' म्हणतांना कंगनाला थोडी तरी लाज वाटायला पाहिजे!

**जेन-झी** पिढीला गटार पिढी आहे,म्हणणाऱ्या कंगनाने स्वतःचा चेहरा आरश्यात पहावा नंतर समजेल कोण गटार आहे आणि कोण शुद्ध आहे.कंगना रानावत लोकप्रतिनिधी आहेत आणि त्या देशाचे नेतृत्व करीत आहे अशा परिस्थितीत आपण काय बोलतो याचे भान त्यांनी ठेवले पाहिजे.सर्वसामान्य जनता बोलतांना आपल्या जिभेवर थोडासा तरी ताबा ठेवतो.परंतु कंगनाला स्वतःच्या बोलण्यावर भान नसल्याचे दिसून येते. कंगना रानावत म्हणते की, पाश्चात्य प्रभावाखालील भारतीय महिलांची नवी पिढी 'जनरेशन गटर' आहे.कंगनाने लक्षात ठेवले पाहिजे की,भारतात पाश्चात्य पध्दतीचा प्रभाव चित्रपट सृष्टीपासून वाढला आहे आणि त्यात आपणही सहभागी होता आणि आहात.सध्याच्या चित्रपटांमध्ये पाश्चात्य पध्दती प्रभावशाली होत आहे हे तुम्हाला दिसत नाही का? त्यामुळे हिंदू संस्कृतीचे वाटोळे होत आहे हे लक्षात येत नाही का?अशा परिस्थितीत तुम्ही पाश्चात्य पध्दतीचा संसदेत विरोध का करीत नाही?परंतु अभद्र वक्तव्य करून कंगनाने लोकप्रतिनिधी या पदाला कलंकित केले आहेत. जेन-झीचे आंदोलन तब्बल ३५ दिवस चालले आणि सरकारच्या माध्यमातून ३६ व्या दिवशी तोडगा निघाला.या आंदोलना दरम्यान सोनम वांगचूक यांनी उपोषण सुध्दा केले व अनेक सामाजिक संघटनांनी आणि विरोधी पक्षांनी पुर्णपणे समर्थन दिले.यावर तोडगा काढण्यासाठी सरकार मार्फत तीन फेऱ्यांच्या चर्चा झाल्या आणि सरकार सुध्दा कॉकरोच जनता पार्टी समोर झुकले. पक्ष-विपक्ष व सरकार विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा तोडगा निघावा यासाठी प्रयत्नशील होते.हे सर्व झाल्यानंतर आणि तोडगा निघाल्यानंतर युवा पिढी बद्दल घाणेरड्या दर्जाचे वक्तव्य करने एका लोकप्रतिनिधीला शोभा देत नाही असे मला वाटते.कंगनाने याचा विचार केला का की, लाखो युवा रस्त्यावर का आले? त्यांच्या भावनांना किती मोठी ठेस पोहोचली असावी याचा विचार केला का?युवकांच्या भावनांचा थोडासाही विचार न करता आपल्या चुकांवर पांघरूण घालण्यासाठी वाटेल ते घाणेरडे वक्तव्य एखाद्या लोकप्रतिनिधीने करने म्हणजे लोकशाहीला काळीमा फासणारे म्हणावे लागेल.जंतमंतरचे आंदोलन चित्रपट नसून लोकशाही आहे हे कंगनाने लक्षात ठेवले पाहिजे. आज पेपर फुटीमुळे देशाच्या शिक्षण प्रणालीवर मोठा काळा धब्बा लागला आहे आणि ही घटना संपूर्ण जगाने उघड्या डोळ्यांनी पहाली.कारण राजकीय पुढाऱ्यांचे मुले विदेशात शिकतात ते कंगणाला दिसत नाही का?आज भारतातील राजकीय पुढाऱ्यांना आपल्या मुलांना सरकारी शाळा-महाविद्यालयाला शिकवायला लाज वाटते. राजकीय पुढाऱ्यांचे मुले जर सरकारी शाळा-महाविद्यालयात शिकली असती तर देशात पेपर फुटीचा प्रकार दिसलाच नसता व जेन-झी रस्त्यावर आल्याचे दिसले नसते.राजकिय पुढाऱ्यांचे मुले विदेशात आणि सर्वसामान्यांची मुले देशात शिकत आहे आणि त्यातही पेपर फुटी या असहय्य वेदना युवकांना कशा काय सहन होणार?आज जेन-झी देशाचे भविष्य आहे हेही लक्षात ठेवले पाहिजे.आज युवकांना काय वेदना होत आहे याची जाण कंगणाला नसावी.जेन-झीने जे काही केले ते आत्म्यातुन केले आणि कंगना जे घृणास्पद वक्तव्य केले ते राजकीय प्रेरीत आहे ही बाब कंगना राणावत ने लक्षात ठेवली पाहिजे आणि गटार जेन-झी आहे की स्वतः कंगना आहे हे सरकारने ठरवून कंगना राणावतच्या घृणास्पद वक्तव्यावर लगाम कसली पाहिजे. कंगना राणावत यांनी जेन-झीचा उल्लेख 'गटार पिढी' असा करून युवकांच्या जखमेवर मिठ चोळण्याचे काम केले. कंगना रानावत यांनी जेन-झीचा उल्लेख 'गटार पिढी'असा केला आणि त्यांच्या ध्वनि चित्रफिती पाहून आपल्याला मळमळते, ओकाऱ्या येते असे इन्स्टाग्राम वर लिहिले.'जंतरमंतर येथे झालेली निदर्शने घाणं, कचरा आणि कुरूपतेचे दर्शन होते,असे रानावत यांनी म्हटले आहे.सोशल मीडियावर जेन-झीचे व्हायरल रील्स पाहून मला ओकारी आल्यासारखे वाटते.हे लोक ड्रग्स आणि दारू पिण्याच्या स्वातंत्र्याचा अभिमान बाळगत आहेत.कंगना रानावतला दारू आणि ड्रग्स सारख्या नशेली पदार्थांची एवढी घृणा वाटत आहे तर आतापर्यंत सरकारने किंवा कंगनाने दारू बंदी किंवा नशेली पदार्थांबद्दल आवाज का उठवला नाही व दारू किंवा नशेली पदार्थांच्या फॅक्टऱ्या बंद का केल्या नाहीत. आपण काय बोलतो याचे भान रानावत यांनी ठेवले पाहिजे. जेन-झीच्या आंदोलनावर सरकार एकीकडे तोडगा काढत आहे तर, दुसरीकडे कंगना रानावत सीजेपीच्या आंदोलनावर अभद्र भाषा बोलुन युवा पिढीच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करीत आहे ही बाब लोकप्रतिनिधीला शोभा देत नाही.कंगना म्हणते कॉकरोच गंघगी पसरवित आहे, कंगनाजी आपण थोड्या चुकलात कॉकरोच गंधगी पसरवित नसुन गंधगी साफ करण्याचे काम करीत आहेत आणि करून दाखवले म्हणून तुम्हाला कॉकरोच गटार वाटत आहे.चित्रपटामध्ये काहीही बोलले तर चालते,परंतु इथे कृती करून दाखवावी लागते. कॉकरोच जनता पार्टी सहजच तयार झाली नसुन तुम्ही चुका केल्या म्हणून ती तयार झाली आहे आणि तुमच्या चुकांचे निराकरण करण्यासाठी ते ठाम आहेत.कंगना म्हणते की,'मैने अपनी जिंदगी मे कभी किसी एक जगह पर इतना भद्दापन नहीं देखा' बरोबर आहे आपण पाहुही शकत नाही.कारण आतापर्यंत तुम्ही चित्रपटांमध्ये काम करायच्या आता तुम्हाला लोकांमध्ये करावे लागत आहे आणि लोकांनामध्ये काम करतांना कसे बोलावे याचा तुम्हाला अभ्यास नसावा.कारण तुमच्या वक्तव्यावरून भाजपाच्या नेत्यांनी सुद्धा नाराजगी व्यक्त करीत आहे.जय हिंद!

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

# 'गुरु' : ज्ञान, संस्कार आणि जीवनाला दिशा देणारा प्रकाशस्तंभ

'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षातब परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः'

भारतीय संस्कृतीमध्ये 'गुरु' या शब्दाला अत्यंत पवित्र आणि सर्वोच्च स्थान आहे. 'गु' म्हणजे अंधकार आणि 'रु' म्हणजे तो दूर करणारा. अज्ञानाचा अंधकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देणारा तो गुरु. म्हणूनच भारतीय परंपरेत गुरु हा केवळ शिक्षक नसून तो जीवनाला योग्य दिशा देणारा मार्गदर्शक, संस्कारकर्ता आणि व्यक्तिमत्त्व घडविणारा शिल्पकार मानला जातो.

आषाढ पौर्णिमेला साजरी केली जाणारी गुरुपौर्णिमा ही भारतीय संस्कृतीतील एक अद्वितीय परंपरा आहे. महर्षी वेदव्यास यांचा जन्मदिन म्हणून हा दिवस 'व्यासपौर्णिमा' म्हणूनही ओळखला जातो. वेदांचे विभाजन, महाभारताची निर्मिती, अठरा पुराणांची रचना आणि सनातन ज्ञानपरंपरेचे जतन करणाऱ्या वेदव्यासांना आद्यगुरु मानले जाते. त्यामुळे या दिवशी सर्व गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची परंपरा आहे.

आज विज्ञान, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि माहितीच्या महासागरात जगणाऱ्या आधुनिक समाजालाही गुरुची गरज तितकीच आहे, किंबहुना अधिक आहे. कारण माहिती (Information) सहज उपलब्ध असली तरी विवेकपूर्ण ज्ञान (थळीवो) आणि योग्य मूल्यांची जडणघडण गुरुच घडवू शकतो.

भारतीय संस्कृतीतील गुरुचे स्थान:

भारतीय संस्कृतीत माता, पिता आणि गुरु यांना देवतुल्य मानले आहे. 'मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव.'

आई जीवन देते, वडील जगण्याची साधने देतात, पण गुरु जीवन कसे जगावे हे शिकवतो. त्यामुळेच गुरुचे स्थान सर्वोच्च मानले गेले आहे. प्राचीन गुरुकुल व्यवस्थेमध्ये शिक्षण हे केवळ पुस्तकापुरते मर्यादित नव्हते. ते जीवनशिक्षण होते. विद्यार्थ्यांना ज्ञानासोबत शिस्त, संयम, श्रमसंस्कार, निसर्गप्रेम, राष्ट्रभक्ती, समाजसेवा आणि चारित्र्य यांचे शिक्षण दिले जात असे. त्यामुळे ते केवळ विद्वान नव्हे तर आदर्श नागरिक बनत असत.

'आध्यात्मिक गुरुचे महत्त्व' भारतीय अध्यात्मामध्ये गुरुशिवाय आत्मज्ञान प्राप्त होणे अत्यंत कठीण मानले गेले आहे. संत कबीर म्हणतात.

'गुरु गोविंद दोऊ खड़े, काके लागूँ पाय।
बलिहारी गुरु आपनो, गोविंद दियो बताय'

याचा अर्थ अत्यंत गहन आहे. गुरु आणि परमेश्वर दोघे समोर उभे असतील तर प्रथम गुरुच्या चरणी वंदन करावे, कारण परमेश्वराची ओळखही गुरुच करून देतो.

भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाचे सारथ्य केले, पण त्याच वेळी ते त्याचे गुरुही होते. भगवद्गीतेच्या माध्यमातून त्यांनी अर्जुनाचा संभ्रम दूर करून त्याला कर्तव्याचा मार्ग दाखविला. त्यामुळेच गीता हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून जीवन जगण्याचा सर्वोत्तम मार्गदर्शक ग्रंथ ठरतो.

संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, समर्थ रामदास, संत एकनाथ, स्वामी विवेकानंद यांसारख्या महान विभूतींच्या जीवनामध्ये गुरुचे स्थान अत्यंत महत्त्वाचे होते. त्यांनी केवळ आध्यात्मिक उन्नती केली नाही, तर समाजालाही नवी दिशा दिली.

'शाळेतील शिक्षक' - जीवनाचे खरे शिल्पकार:

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात सर्वप्रथम भेटणारे गुरु म्हणजे त्याचे शिक्षक.

एखाद्या बालकाच्या हातात पहिली पेन्सिल देणारा, पहिले अक्षर शिकवणारा, चूक झाली तर प्रेमाने दुरुस्त करणारा, यश मिळाले तर कौतुक करणारा आणि अपयश आले तर धीर देणारा शिक्षक हा त्या विद्यार्थ्याचा आयुष्यभराचा गुरु असतो.

आपण डॉक्टर, अभियंता, वकील, बँकर, अधिकारी, शास्त्रज्ञ, उद्योजक, व्यावसायिक किंवा राजकारणी होतो; परंतु त्या यशामागे अनेक शिक्षकांचे योगदान असते.

विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वातील आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, वेळेचे नियोजन, शिस्त, अभ्यासाची सवय, नेतृत्वगुण, संघभावना आणि सामाजिक जबाबदारी या सर्वांचा पाया शाळेतील शिक्षक घालत असतो.

खरे तर प्रत्येक शिक्षक हा केवळ विषय शिकवत नाही, तर तो जीवन जगण्याची कला शिकवत असतो.

'महाविद्यालयातील गुरु' - करिअरला दिशा देणारे मार्गदर्शक : महाविद्यालयीन जीवनात शिक्षकांची भूमिका अधिक व्यापक होते. ते विद्यार्थ्यांना केवळ पदवी मिळिवण्यासाठी तयार करत नाहीत, तर विचार करायला शिकवतात. योग्य प्रश्न विचारण्याची क्षमता, संशोधनाची वृत्ती, निर्णयक्षमता, नेतृत्व, व्यावसायिक नैतिकता आणि समाजाविषयीची संवेदनशीलता निर्माण करतात. जीवनात कोणता व्यवसाय निवडायचा, कोणत्या क्षेत्रात प्रगती करायची, कोणती मूल्ये जपायची याचे मार्गदर्शन अनेकांना आपल्या प्राध्यापकांकडूनच मिळते. अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा एका शिक्षकाच्या एका वाक्यामुळे मिळाल्याची असंख्य उदाहरणे आपल्या समाजात आहेत. 'गुरु म्हणजे फक्त व्यक्ती नाही, तर एक विचार आहे' भारतीय संस्कृती गुरुची व्याख्या खूप व्यापक करते.

आपले आई-वडील आपले गुरु असतात.
निसर्ग आपला गुरु असतो.
अनुभव हा गुरु असतो.
अपयश हेही गुरु असते.
पुस्तके गुरु असतात.

समाजातील प्रत्येक चांगली व्यक्ती आपल्याला काही ना काही शिकवून जाते. म्हणूनच शिकण्याची वृत्ती जिवंत ठेवणारा प्रत्येक मनुष्य आयुष्यभर विद्यार्थी राहतो.

'आधुनिक युगातील गुरुची भूमिका'

आज माहिती एका क्लिकवर उपलब्ध आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) अनेक प्रश्नांची उत्तरे देते. इंटरनेटवर हजारो अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

'परंतु माहिती म्हणजे ज्ञान नाही आणि ज्ञान म्हणजे विवेक नाही.' एआय माहिती देऊ शकते; परंतु मूल्ये शिकवू शकत नाही. मोबाईल उत्तर देऊ शकतो; परंतु चारित्र्य घडवू शकत नाही. तंत्रज्ञान कौशल्य देऊ शकते; परंतु योग्य निर्णय घेण्याची नैतिकता गुरुच शिकवतो. आजच्या काळात विद्यार्थ्यांना मानसिक ताण, स्पर्धा, सोशल मीडियाचा प्रभाव, व्यसनाधीनता आणि करिअरविषयीची अनिश्चितता यांचा सामना करावा लागतो. अशा वेळी संवेदनशील शिक्षक आणि मार्गदर्शकांची भूमिका पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाची ठरते.

'समाजनिर्मितीत गुरुचे योगदान'

ज्या राष्ट्रात चांगले गुरु असतात ते राष्ट्र प्रगत होते. एका उत्कृष्ट शिक्षकामुळे शेकडो विद्यार्थी घडतात. ते विद्यार्थी पुढे समाज, उद्योग, विज्ञान, प्रशासन, न्यायव्यवस्था, शेती, आरोग्य, शिक्षण आणि राष्ट्रसेवा या सर्व क्षेत्रांत योगदान देतात.

म्हणूनच शिक्षक हा केवळ व्यक्ती घडवत नाही; तो संपूर्ण समाज आणि राष्ट्र घडवत असतो.

भारताला 'विश्वगुरु' बनवायचे असेल तर सर्वप्रथम आपल्या गुरुजनांचा सन्मान, शिक्षकांचे सक्षमीकरण आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल.

गुरुपौर्णिमेचा खरा संदेश:

गुरुपौर्णिमा म्हणजे केवळ गुरुंचे पूजन नव्हे.

हा दिवस आहे. आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा. त्यांच्या शिकवणीचे स्मरण करण्याचा. आयुष्यातील चांगल्या मूल्यांचे पालन करण्याचा. स्वतःही इतरांसाठी मार्गदर्शक होण्याचा. सतत शिकत राहण्याची प्रतिज्ञा करण्याचा. गुरुचे ऋण कधीच फेडता येत नाही.

पण त्याने दिलेल्या ज्ञानाचा समाजहितासाठी उपयोग करणे, त्याच्या शिकवणीप्रमाणे प्रामाणिक जीवन जगणे आणि पुढील पिढीपर्यंत चांगले संस्कार पोहोचवणे हीच गुरुंना खरी गुरुदक्षिणा आहे. आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानप्रधान जगात ज्ञान मिळिवणे सोपे झाले आहे; परंतु योग्य मार्ग निवडणे अधिक कठीण झाले आहे. अशा काळात गुरु हा केवळ ज्ञानदाता नसून विवेकाचा दीपस्तंभ आहे. तो विद्यार्थ्याच्या सुप्त क्षमतांना जागवतो, त्याला आत्मविश्वास देतो, संकटात धैर्य देतो आणि यशात विनम्रता शिकवतो.

गुरु हे केवळ वर्गखोल्यांमध्ये नसतात: ते आपल्या प्रत्येक अनुभवात, प्रत्येक चांगल्या विचारात आणि प्रत्येक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वात असतात. जो मनुष्य आपल्या जीवनात भेटलेल्या प्रत्येक गुरुचे ऋण मान्य करतो, तोच खऱ्या अर्थाने समृद्ध होतो.

या पवित्र गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने

'गुरु म्हणजे केवळ ज्ञान देणारा नव्हे;

तर अज्ञानातून ज्ञानाकडे, असत्यातून सत्याकडे आणि अंधारातून प्रकाशाकडे नेणारा जीवनदीप आहे.'

माझी गुरुदक्षिणा - ज्ञान वाटण्याचा संकल्प

जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर मला अनेक गुरु लाभले. बालपणी संस्कार देणारे आई-वडील, शाळा-महाविद्यालयातील शिक्षक, अध्यात्माची दिशा देणारे सद्गुरु आणि बँकिंग क्षेत्रात काम करताना अनुभव, मूल्ये, नेतृत्व आणि निर्णयक्षमतेचे धडे देणारे अनेक वरिष्ठ अधिकारी व मार्गदर्शकङ्घ या सर्वांनी माझ्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण केली. आज मी जे काही आहे, त्यामागे त्यांच्या आशीर्वादाचा आणि मार्गदर्शनाचा मोठा वाटा आहे.

माझ्या व्यावसायिक आयुष्यातील सुमारे ३६ वर्षांचा प्रवास पूर्ण करून मी व्यवस्थापकीय संचालक (MD&CEO) या पदावरून निवृत्त झालो. त्या वेळी माझ्या जीवनाला नवी दिशा देणारा एक अत्यंत महत्त्वाचा प्रसंग घडला. सहकार क्षेत्रात आणि बँकिंग क्षेत्रातील सर्वोच्च स्थानावर कार्यरत असलेल्या आणि माझ्यासाठी गुरुतुल्य असलेल्या दोन-तीन ज्येष्ठ मार्गदर्शकांनी मला प्रेमाने, पण ठाम शब्दांत एक गुरु-आज्ञाच दिली.

माझा एक साधा जीवनमंत्र झाला आहेङ्घ

'जे जे आपल्या जवळ आहे ते मनापासून द्यायचे; आणि जे नाही ते सतत शिकून, मिळवून पुन्हा समाजाला द्यायचे.'

ज्ञान वाटल्याने ते कमी होत नाही; उलट ते अधिक समृद्ध होते. आपल्या अनुभवाचा उपयोग दुसऱ्यांच्या यशासाठी होताना जो आनंद मिळतो, तीच माझ्यासाठी खरी गुरुदक्षिणा आणि खरी साधना आहे.

गुरुपौर्णिमेच्या या पावन दिवशी मला अध्यात्माची दिशा देणाऱ्या माझ्या सद्गुरूंना, जीवनमूल्ये शिकविणाऱ्या शिक्षकांना, व्यावसायिक संवादातून मला मार्गदर्शन करणाऱ्या व्यावसायिक गुरूंना, आयुष्यात शिक्षण रूपाने ज्ञान देऊन माझ्यात बदल घडविणाऱ्या सर्व ज्येष्ठ मार्गदर्शकांना आणि माझ्या प्रत्येक यशामागे उभ्या असलेल्या सर्व गुरुजनांना मी कृतज्ञतापूर्वक विनम्र प्रणाम करतो. त्यांचे प्रेम, आशीर्वाद आणि मार्गदर्शन आयुष्यभर असेच लाभत राहो, आणि त्यांनी दाखविलेल्या ज्ञानसेवेच्या मार्गावर चालण्याची शक्ती परमेश्वराने मला सतत द्यावी, हीच श्रीगुरुचरणी नम्र प्रार्थना.

तस्मै श्रीगुरवे नमः!
सर्व गुरुजनांना कोटी कोटी प्रणाम!
गुरुपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!

**- व्यंकटेश कुळकर्णी.**
प्रशिक्षण केंद्र प्रमुख.
सहकार बाजारती सहकार प्रशिक्षण केंद्र पुणे.

# श्रावणी स्वाती हरिष लालसरे यांनी रांगोळीतून साकारली विठ्ठल-रुख्मिनी प्रतिमा



वैजापूर, दि. ३० (प्रतिनिधी) येथील मारवाडी गल्लीतील श्रावणी स्वाती हरिष लालसरे यांनी आषाढी पौर्णिमा निमित्त आपल्या घरातच बैठकीत पंढरपूरच्या विठ्ठल-रुख्मिनी ची प्रतिमा रांगोळीतून साकारून शहरातील भक्त भाविकांना विठ्ठल-रुख्मिनी दर्शन घडविले. ती गत ३-४वर्षापासून आपल्या कलेतून रांगोळी च्या द्वारे विठ्ठल-रुख्मिनी काढत असते. तिच्या या कलेचे कौतुक सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत, राजेंद्र लालसरे, मकरंद कुलकर्णी यांनी कौतूक केले.

# देशात सामाजिक समरसता अभियान चालविण्याची नितांत गरज - नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी



वैजापूर, दि. (प्रतिनिधी) - देशात ढासळत असलेली सामाजिक स्थिती व स्तर सुस्थितीत आणण्यासाठी व समाजात सामाजिक, नैतिक, व राष्ट्रीय मूल्ये चांगल्या प्रकारे रुजवायची असतील तर 'सामाजिक समरसता' अभियान चालविणे व समाज जागृती करणे काळाची गरज आहे,असे प्रतीपादन नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी यांनी बुधवार(ता.२९)रोजी गुरू पोर्णिमा औचित्य साधत पोटे गल्लीतील संत रविदास समाज मंदिरात केले. संत रविदास महाराज यांचे हे ६५०वे जयंती वर्ष आहे. त्या निमित्त भाजपा सामाजिक समरसता अंतर्गत हा कार्यक्रम वैजापूर दक्षिण मंडळाचे अभियान सह प्रमुख राजेश गायकवाड व तालुका प्रमुखप्रदीप चव्हाण व सर्व पदाधिकारी यांनी आयोजित केला होता.सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत प्रमुख वक्ते होते,त्यांनी संबोधित करतांना सांगितले की,समाज म्हणजे सामाजिक संबंधाचे जाळे होय,समाज संघटित राहणे,समाजातील प्रत्येकाने दुसऱ्याना सहकार्य करणे, दुसऱ्यांचे हित जपणे व राष्ट्राच्या उन्नती व विकासाला हातभार लावणे हे प्रत्येकाचे कर्तव्य होय. संत रविदास महाराज यांच्या-'कर्म हीच पूजा' याचा संदर्भ देत त्यांनी काम व कर्तव्याचे जीवनातील महत्व विशद केले. आरंभी डॉ. दिनेश परदेशी यांनी ,संत रविदास महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार टाकला व दीप प्रजवलन केले.

सामाजिक समरसता अभियान हे वर्षभर चालणार असून विविध कार्यक्रम यापुढे चालत राहणार आहेत. या प्रसंगी तालुका अध्यक्ष संदीप ठोंबरे, नगरसेवक प्रशांत कंगले, राजेश गायकवाड, दिनेश राजपूत, सचिन जोशी, शैलेश पोंदे, प्रेम राजपूत संमित पाजी, करण जेजुरकर, अर्जुन राजपूत, गिरीश चापानेरकर, पंढरीनाथ पोटे, अविनाश पोटे, सचिन पोटे, सुरेश पोटे, कल्याण काळे,माजी नगरसेविका श्रीमती पोटे ताई, व पोटे गल्लीतील नागरिक महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रदीप चव्हाण यांनी सूत्र संचलन केले. राजेश गायकवाड यांनी आभार मानले.

# ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी आनंदाची बातमी! NCMC स्मार्ट कार्डसाठी १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

मुंबई, दि. ३० (प्रतिनिधी) - महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसने प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. एसटी प्रवासातील शासकीय सवलतींचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेल्या छउचउ (छरींळेपरश्र उेाप चेलळश्रळीं उरीव) स्मार्ट कार्ड सक्तीच्या अंमलबजावणीला आता १ सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी हा निर्णय जाहीर केला. अनेक पात्र प्रवाशांनी स्मार्ट कार्डसाठी अर्ज करूनही त्यांना अद्याप कार्ड प्राप्त झालेले नसल्यामुळे सवलतीपासून वंचित राहण्याची शक्यता होती. ही गैरसोय टाळण्यासाठी शासनाने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्य शासनाकडून अमृत ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, तर ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत दिली जाते. या सवलतींची प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी छउचउ स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

पूर्वी हा नियम १ ऑगस्ट २०२६ पासून लागू होणार होता. मात्र, मोठ्या प्रमाणावर अर्जदारांना कार्ड वितरित न झाल्याने शासनाने त्याच्या अंमलबजावणीस १ सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. परिवहन विभागाने पात्र नागरिकांना या वाढीव कालावधीत स्मार्ट कार्डची नोंदणी व आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून भविष्यात एसटी प्रवासातील शासकीय सवलतींचा लाभ कोणत्याही अडचणीशिवाय मिळू शकेल.

# छत्रपती संभाजीनगर हेड पोस्ट ऑफिसमधील प्रवर डाकपाल यांच्या अरेरावी व दडपशाहीच्या निषेधार्थ काळी फित लावून आंदोलन



छत्रपती संभाजीनगर, दि. ३० (प्रतिनिधी) - छत्रपती संभाजीनगर हेड पोस्ट ऑफिस येथील प्रवर डाकपाल यांच्या कथित अरेरावी, दडपशाही व कर्मचारीविरोधी कार्यपद्धतीच्या निषेधार्थ FNPO व NFPE संयुक्त कृती समितीच्या वतीने दिनांक २९ जुलै २०२६ रोजी काळी फित लावून शांततापूर्ण पद्धतीने निषेध आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनामध्ये छत्रपती संभाजीनगर विभाग व जालना विभागातील पोस्टमन कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत प्रशासनाविरोधातील आपली नाराजी व्यक्त केली.

कर्मचारी हिताचे प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, दडपशाहीचे वातावरण थांबवावे तसेच कर्मचाऱ्यांना न्याय्य व सन्मानपूर्वक वागणूक द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

हे आंदोलन श्री. आर. पी. सारंग (महासचिव) व श्री. निसार मुजावर यांच्या आदेशानुसार पार पडले. तसेच श्री. संतोष लाड यांचे मोलाचे मार्गदर्शन या आंदोलनास लाभले.

या आंदोलनात श्री. रवी भोसले (सचिव), श्री. देवेंद्र परदेशी, श्री. शेख फारुख, श्री. सुनील शिंदे आणि श्री. सय्यद ताज मोहम्मद यांनी सक्रिय सहभाग घेत कर्मचारी वर्गाला मार्गदर्शन केले. संयुक्त कृती समितीने प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांची तातडीने दखल घेऊन संबंधित प्रकारांची निष्पक्ष चौकशी करावी व कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अन्यथा भविष्यात अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

# मतदार यादी विशेष पुनरिक्षणाला वेग; ८ ऑगस्टपर्यंत गणना अर्ज भरण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. ३० (प्रतिनिधी) - महाराष्ट्र राज्यात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू असून, सध्याच्या मतदार यादीतील सर्व मतदारांनी ८ ऑगस्ट २०२६ पर्यंत गणना अर्ज भरून संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे जमा करावेत, असे आवाहन निवडणूक प्रशासनाने केले आहे.

गृहभेटीदरम्यान बीएलओकडे स्वाक्षरीसह सादर करण्यात आलेल्या गणना अर्जांच्या आधारे संबंधित मतदारांची नावे १७ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप मतदार यादीत समाविष्ट करण्यात येणार आहेत. प्रारूप यादीत नाव नसलेल्या पात्र मतदारांना किंवा नवमतदारांना १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नमुना क्रमांक ६, आवश्यक कागदपत्रे व घोषणापत्रासह भरून नाव समाविष्ट करण्याची संधी उपलब्ध राहणार आहे.

संबंधित अर्जांची पडताळणी करून पात्र मतदारांची नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्यात येतील. दावे व हरकतीच्या या कालावधीत मतदारांना मतदार यादीतील तपशीलात दुरुस्ती करण्यासाठी नमुना ८, तर चुकीची किंवा अपात्र नोंद वगळण्यासाठी संबंधित मतदारसंघातील कोणताही मतदार नमुना ७ भरून हरकत नोंदवू शकतो.

निवडणूक प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, मतदार नोंदणीसाठी किंवा दुरुस्तीसाठी अर्ज करताना चुकीची माहिती अथवा खोटी घोषणा केल्यास लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या कलम ३१ नुसार संबंधित व्यक्तीला एक वर्षापर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

या विशेष पुनरिक्षणानंतर १९ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

तसेच, अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतरही लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या कलम २२ व २३ नुसार मतदार यादीत नाव समाविष्ट करणे किंवा दुरुस्ती करण्याची सुविधा कायम राहणार आहे. पात्र नागरिकांना नमुना क्रमांक ६ द्वारे अर्ज करता येणार असून, मतदार यादीचे निरंतर अद्ययावतीकरण ही प्रक्रिया सुरू राहील. कलम २३(३) नुसार कोणत्याही निवडणुकीसाठी नामनिर्देशन अर्ज भरण्याच्या अंतिम तारखेपर्यंत अशा दुरुस्त्या करता येतात.

- ८ ऑगस्ट २०२६ - गणना अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत
- १७ ऑगस्ट २०२६ - प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध
- १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६ - दावे व हरकतीचा कालावधी (नमुना ६, ७ व ८)
- १९ ऑक्टोबर २०२६ - अंतिम मतदार यादी प्रसिद्ध.

# सरला बेटचे ब्रह्मलिन नारायणगिरी महाराज यांची रागोळीतून अविनाश पोटे याने साकारली सुंदर प्रतिमा




वैजापूर, दि. ३० (प्रतिनिधी) -येथील रांगोळी कलाकार व उत्कृष्ट रांगोळीकार उमेश उर्फ अविनाश पोटे यांनी गुरू पोर्णिमेच्या निमीत्त सरला बेटचे ब्रह्मलिन हभप नारायणगिरी महाराज यांची रांगोळीच्या माध्यमातून हुबेहूब प्रतिमा सरला बेटावर जाऊन तेथे ही रांगोळी काढून गुरूपौर्णिमा निमित्त त्यांच्यां स्मृतींना अभिवादन केले.त्यांच्या या कलेचे तोंडभरून कौतुक सरला बेटचे विद्यमान महंत हभप रामगिरी महाराज यांनी केले. उमेश उर्फ अविनाश पोटे चे नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी, सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत यांनी ही कौतुक केले.

# अभिजीत दीपकेंनी धमकी देणाऱ्या भाजप नेत्यांची नावे जाहीर करावीत -महसूलमंत्री बावनकुळे

मुंबई, दि. ३० (प्रतिनिधी) - : कॉकरोच जनता पार्टीचे अध्यक्ष अभिजीत दीपके यांनी विद्यार्थी आंदोलनादरम्यान भाजपच्या नेत्यांकडून धमक्या आणि पक्षप्रवेशाची ऑफर देण्यात आल्याचे आरोप केले. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे आरोप फेटाळून लावले असून, 'दीपके यांना जर खरोखरच कोणी धमकी दिली असेल तर त्यांनी संबंधित व्यक्तीचे नाव उघड करावे. हवे असल्यास आम्ही त्या कार्यकर्त्यावर कठोर कारवाई करू, परंतु ठोस पुराव्यांशिवाय भाजपची जाणीवपूर्वक बदनामी करू नये,' असा सल्ला दिला आहे.

ठाणे येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना महसूल मंत्री बावनकुळे बोलत होते. आंदोलनादरम्यान आपल्याला आणि आपल्या कुटुंबाला भाजपकडून धमक्या आल्याचा दावा दीपके यांनी केला होता. त्यावर बोलताना बावनकुळे म्हणाले, 'भाजप हा देशातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असून एकट्या महाराष्ट्रात पक्षाचे १ कोटी ५१ लाखांहून अधिक प्राथमिक सदस्य आहेत. इतक्या मोठ्या संघटनेत कोणी त्यांना धमकी दिली किंवा पक्षाची ऑफर दिली, याबद्दल दीपके यांनी स्पष्टपणे नावे जाहीर करावीत. नाव न सांगता राजकीय हेतूने पक्षावर चिखलफेक करणे योग्य नाही.' यावेळी बोलताना बावनकुळे यांनी महसूल विभागाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यात २२ जुलै ते २ ऑगस्ट दरम्यान 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' राबवले जात आहे. या अभियानांतर्गत राज्यातील सुमारे १० लाख कुटुंबांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्याचे उद्दिष्ट असून, एकट्या ठाणे जिल्ह्यात ७६ हजार कुटुंबांपर्यंत लाभ पोहोचवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# बेशिस्त रिक्षाचालकांवर पोलिसांचा मोठा दणका; १,२१५ रिक्षांवर कारवाई, तब्बल १९.५२ लाखांचा दंड

छत्रपती संभाजीनगर, दि. ३० (प्रतिनिधी) - शहरातील बेशिस्त आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षाचालकांविरोधात वाहतूक शाखेने विशेष मोहीम राबवत मोठी कारवाई केली आहे. सोमवारी (२८ जुलै २०२६) सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत चाललेल्या या मोहिमेत तब्बल १,२१५ रिक्षाचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

वाहतूक पोलिसांनी रिक्षा थांब्यावर बेशिस्तपणे वाहने उभी करणे, विनागणवेश रिक्षा चालविणे, पुढील सीटवर प्रवासी बसविणे, विनापरवाना वाहन चालविणे तसेच मोठ्या प्रमाणात प्रलंबित दंड असलेल्या रिक्षांवर विशेष लक्ष केंद्रित केले.

या धडक मोहिमेदरम्यान रू १९ लाख ५२ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला, तर त्यापैकी रू १ लाख ३९ हजार ६०० रुपयांची वसुली करण्यात आली. तसेच नियमांचे गंभीर उल्लंघन करणाऱ्या सहा रिक्षा जप्त करण्यात आल्या आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त प्रविण पवार, पोलीस उपआयुक्त शर्मिष्ठा घारगे-वालावलकर आणि सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतूक) सुभाष भुजंग यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक रेखा लोंढे, मंगेश जगताप, पवन चौधरी तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक रविकांत गच्चे आणि सचिन मिरधे यांनी आपल्या पथकासह ही मोहीम राबवली.

वाहतूक शाखेने स्पष्ट केले आहे की, नियमांचे पालन करणाऱ्या रिक्षाचालकांना कोणताही त्रास होणार नाही. मात्र, बेशिस्त, उद्धट आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांविरोधातील कारवाई यापुढेही सुरू राहणार आहे. वाहतूक विभागाने सर्व रिक्षाचालक आणि वाहनधारकांना नियमांचे पालन करून शिस्तीत वाहन चालविण्याचे आवाहन केले आहे.

# पँथर्स रिपब्लिकन पार्टीच्या राज्य उपाध्यक्षपदी देवानंद खंदारे यांची निवड



छत्रपती संभाजीनगर, दि. ३० (प्रतिनिधी) - पँथर्स रिपब्लिकन पार्टीच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी देवानंद खंदारे यांची निवड करण्यात आली. राज्य कमिटीच्या झालेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत ही निवड करण्यात आली. पँथर्स रिपब्लिकन पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षा प्राचार्य सूर्यकांता गाडे यांनी ही निवड केली आहे.

यावेळी पँथरस रिपब्लिकन पार्टीच्या युवा आघाडीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉ. सिद्धांत दादा गाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. देवानंद खंदारे हे गेल्या अनेक वर्षापासून आंबेडकरी विचारांच्या चळवळीत काम करतात.

गंगाधरजी गाडे यांच्या विचारावर त्यांची निष्ठा आहे. गाडे साहेब चळवळीत सक्रिय असताना त्यांच्यासोबत काम करण्याची संधी त्यांना मिळाली होती. आता पुन्हा त्यांनी पँथर्स रिपब्लिकन पार्टीत प्रवेश घेऊन सक्रिय राहण्याचे घोषित केले. पँथर्स रिपब्लिकन पार्टीचा विचार, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा क्रांतिकारींचा परिवर्तनाचा आणि समतेचा विचार गावागावात पोहचविण्याचे काम आपण प्रामाणिकपणे करू असे आश्वासन यावेळी देवानंद खंदारे यांनी दिले. या बैठकीस विलास कटारे, साहेबराव नवतुरे, भीमराव दाभाडे, राहुल कांबळे, चव्हाण मामा यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रीपाल सबनीस यांचा संघर्ष परिषदेत हल्लाबोल



छत्रपती संभाजीनगर, दि. ३० (प्रतिनिधी) - कॉकरोच जनता पार्टीचे अभिजीत दिपके यांनी तरुणाईमध्ये क्रांतीची ज्योत पेटविली केंद्रातील सत्ताधाऱ्या विरोधात विद्यार्थी पेटून उठला त्यामुळे साम्राज्य जाण्याच्या भीतीपोटी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी कॉम्प्रमाईज केले. असा हल्लाबोल अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाल सबनीस यांनी केला. पँथरस रिपब्लिकन पार्टीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विद्यापीठ नामांतर ठराव संघर्ष परिषदेचे उद्घाटन सोमवारी श्री. सबनीस यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर प्रसिद्ध कवी अनंत राऊत अभिजीत दिपके यांचे आई-वडील, पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सूर्यकांता गाडे, प्रदेशाध्यक्ष डॉक्टर सिद्धांत गाडे प्राचार्य भावना गाडे, पँथर नेते ऍड. रमेशभाई खंडागळे यांची प्रमुख उपस्थिती होती पुढे बोलताना श्री.सबनीस म्हणाले केंद्रातील सत्ताधाऱ्यांचे बेधुंद वागणे पाहता मी सुद्धा हतबल झालो होतो. आता काही होऊ शकत नाही, असे वाटत होते भारतीय राजकारणात निराशा आली होती विरोधी पक्ष ही काही करू शकत नव्हता अशा अवस्थेत अभिजीतने जातीय व्यवस्थेचा गड्डा हलविला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुण्याईवर एक कॉक्रोज काय करू शकतो हे देशवासीयांना दाखवून दिले बहुसंख्यांक हिंदूंच्या बळावर सत्ताधीश माजलेले असताना झुरळाने क्रांती केली आणि केंद्रातील सत्ताधाऱ्यांना विद्यार्थ्यांपुढे लोटांगण घालावे मोदी, शहा प्रचंड घाबरले होते त्यामुळे त्यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य केल्या असे सांगून श्री सबनीस म्हणाले बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेले संविधान हे कोणा एका धर्माचे नाही आता या संविधानावरच धर्मांध शक्ती कडून हल्ला होण्याचा धोका आहे त्यामुळे आपण सर्वांनी सावध राहिले पाहिजे यावेळी त्यांनी पँथर नेते गंगाधर गाडे यांनी केलेल्या कार्याला उजाळा दिला.

प्रसिद्ध कवी अनंत राऊत यांनी आपल्या भाषणात कविता सादर करून सत्ताधाऱ्यावर कोरडे ओढले यावेळी अभिजीत जितकेचे वडील यांनी हे आपले मनोगत व्यक्त केले.

ते म्हणाले माझा आणि माझ्या कुटुंबाचा चळवळीशी कधी संबंध आला नाही अभिजीत ने ही चळवळीत पडू नये अशी माझी इच्छा होती परंतु त्याने अमेरिकेतच चळवळ सुरू केली आणि त्या चळवळीला तरुणाईचा प्रचंड प्रतिसाद मिळाला तो आता आमचा मुलगा नाही तर देशाचा मुलगा झालाय अशा शब्दात त्यांनी भावना व्यक्त केल्या. यावेळी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सूर्यकांता गाडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष डॉ.सिद्धांत गाडे यांनी उपस्थितांचे पुष्पहार घालून स्वागत केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.विलास कटारे यांनी केले तर जिल्हाध्यक्ष साहेबराव नवतुरे यांनी उपस्थितांचे आभार मानले या कार्यक्रमापूर्वी प्रसिद्ध गायिका पंचशीला भालेराव यांचा भीम गीताचा बहरदार कार्यक्रम झाला या कार्यक्रमास आनंद गायकवाड देवानंद खंडारे प्रवीण गाडेकर संदीप खरात धम्मपाल कांडेकर सुधीर दूधवडे योगेश गरबडे केतन भदर्गे मुख्तार जागीरदार अमोल नरवडे, राजआनंद सुरतकर नारायण हिवाळे, शकील भाई, संजय बनसोडे, सुनील जाधव, राकेश भाई, सचिन पवार, लताबाई थोरात, शिलाबाई मोरे, शिलाबाई मनोहर यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# महिलांनी वेळेवर आरोग्य तपासणी करून घ्यावी-मेघना साकोरे-बोर्डीकर

## रजोनिवृत्ती व पीसीओडी विषयावरील राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन

छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- महिलांनी रजोनिवृत्ती व पीसीओडीसंदर्भातील आरोग्य समस्यांकडे दुर्लक्ष न करता वेळेवर तपासणी करून तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. तसेच आरोग्य यंत्रणेने याबाबत व्यापक जनजागृती करून आवश्यक आरोग्यसेवा प्रत्येक महिलेपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केले.

महिलांच्या आरोग्याशी संबंधित रजोनिवृत्ती आणि पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम विषयक आरोग्यसेवा अधिक सक्षम व परिणामकारक करण्याच्या उद्देशाने राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन महात्मा गांधी मिशन (एम.जी.एम.) वैद्यकीय महाविद्यालयाच्या हॉलमध्ये सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते झाले.




आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाचे डॉ. कैलास बाविस्कर, उपसंचालक डॉ. आशीष भारती, डॉ. कांचन वानोरे, डॉ. आशिष भारती, डॉ. दयानंद मोतीपवळे, डॉ. प्रशांत हिंगणकर (युनिसेफ), डॉ. मंगेश गढरी (युनिसेफ), डॉ. श्रीनिवास गडप्पा, डॉ. संतोष कडले, डॉ. सुरेश रावते, डॉ. विनायक खेडकर, डॉ. अभय धानोरकर यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी, तज्ज्ञ आणि मोठ्या संख्येने आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

आरोग्य उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यशाळेत मराठवाडा विभागातील स्त्रीरोगतज्ज्ञ, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी तसेच वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

कार्यशाळेत रजोनिवृत्ती व्यवस्थापन, पीसीओडीचे निदान व उपचार, समुपदेशन, आरोग्यदायी जीवनशैली, मानसिक व शारीरिक आरोग्य, आधुनिक उपचारपद्धती आदी विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करण्यात आले. तसेच चर्चासत्र आणि प्रश्नोत्तर सत्राच्या माध्यमातून आरोग्य कर्मचाऱ्यांच्या ज्ञान व कौशल्यात भर घालण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यावेळी तज्ज्ञांनी सांगितले की, बदलती जीवनशैली, अयोग्य आहार, शारीरिक हालचालींचा अभाव आणि वाढता ताण यामुळे पीसीओएसचे प्रमाण वाढत असून वेळेत निदान, योग्य समुपदेशन आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब केल्यास हा विकार प्रभावीपणे नियंत्रणात ठेवता येऊ शकतो.

महिलांच्या आरोग्यविषयक सेवांची गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी आणि रजोनिवृत्ती तसेच पीसीओडीग्रस्त महिलांना दर्जेदार व सर्वसमावेशक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी ही कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# संभाजीनगरचे दोन दिग्गज कोर्टात भिडले! शिरसाट-जलील वादाला नवं वळण; कोर्टात स्वतः केला जोरदार युक्तिवाद





छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- शिवसेनेचे मंत्री तथा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट आणि एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांच्यातील राजकीय संघर्ष सुरूच आहे. काही महिन्यांपूर्वी इम्तियाज जलील यांनी शिरसाट यांच्या विरोधात पत्रकार परिषद घेऊन जाहीर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. यावरून शिरसाट यांनी इम्तियाज जलील यांच्या विरोधात अब्रू नुकसानीचा दावा दाखल केला आहे.

या प्रकरणात सुनावणी झाली असता इम्तियाज यांनी स्वतः कोर्टात उभे राहून आपली बाजू मांडली. संजय शिरसाट यांच्याविरोधात केलेले सर्व आरोप हे आपण पुराव्यासह केले असल्याचा दावा त्यांनी केला. सहदिवाणी न्यायाधीश एम. एस. ए सय्यद यांच्या न्यायालयात झालेल्या सुनावणीत दोन्ही बाजूने युक्तिवाद झाला. इम्तियाज जलील यांनी २४ वर्षे पत्रकारिता आणि दहा वर्षे लोकप्रतिनिधी म्हणून जनतेची सेवा केल्याचं सांगितलं तर दुसरीकडं पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी वतनाची जमीन लाटण्याचा उद्योग केला, असा आरोप केला. यात त्यांचा मुलगा पत्नी आणि एका विकासकाचा समावेश असल्याचा दावाही त्यांनी केला होता. रेल्वे स्टेशन रस्त्यावरील विट्स हॉटेल मुलाच्या नावावर खरेदी केल्याचे सर्व कागदोपत्री पुरावे माझ्याकडे आहेत. याबाबत मुख्यमंत्री, राज्यपाल, विभागीय आयुक्त आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडं आपण तक्रारी दिल्या. मात्र, या तक्रारींची दखल न घेतल्यानं पत्रकार परिषदेद्वारे जनतेसमोर हे सर्व मांडावं लागल्याचं जलील यांनी न्यायालयात सांगितलं.पालकमंत्री संजय शिरसाट यांच्याशी संबंधित वतनाच्या पाच हजार चौरस फुटावरील भूखंडावर १०५ कोटींचा प्रकल्प उभारला जाणार असून त्यातून केवळ ९३ जणांना रोजगार उपलब्ध होणार आहे, ही सरकारी जागा असल्यानं याची लाचलुतपत प्रतिबंधक विभागाकडंही तक्रार करण्यात आली आहे, असंही त्यांनी कोर्टाला सांगितलं. तसंच शिरसाट यांची बाजू मांडणारे अ‍ॅड. राजेश काळे हे पूर्वी माझे वकील आणि कायदेशीर सल्लागार होते. शिरसाट यांच्या पत्नीचे ते भाऊ असून बहिणीच्या पतीवर आरोप होताच त्यांनी मला एक मेसेज पाठवून माझे वकीलपत्र मागे घेतलं, अशा प्रकारे अचानक वकीलपत्र सोडून माझ्याच विरोधात ते कसे उभे राहू शकतात? नैतिकतेच्या आधारावर ते माझ्या विरोधात हे प्रकरण चालवू शकत नाहीत, असंही इम्तियाज जलील यांनी बाजू मांडताना म्हटलं.

यावर स्पष्टीकरण देताना अ‍ॅड. राजेश काळे यांनी न्यायालयाची रीतसर परवानगी घेऊनच आपण इम्तियाज यांचे वकीलपत्र मागे घेतलं होतं. त्यासाठीचं शुल्क सुद्धा मी त्यांना परत केलं आहे. माझ्या नैतिकतेबाबत निर्णय घेण्याचा अधिकार या न्यायालयाला नसून तो विषय बार कौन्सिलचा आहे असं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं. संजय शिरसाट हे माझ्या बहिणीचे पती आहेत याची कबुलीही काळे यांनी दिली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता १७ ऑगस्ट रोजी होणार आहे.

# जायकवाडी धरणात ७१.२५ टक्के पाणीसाठा; खरीप सिंचनासाठी कालव्यांतून आवर्तन सुरू

पैठण दि.३० (प्रतिनिधी)- गोदावरीच्या वरच्या खोऱ्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पैठण येथील जायकवाडी धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. गुरुवारी (दि. ३०) सायंकाळी ६ वाजेपर्यंत धरणात ७१.२५ टक्के पाणीसाठा झाला असून, धरणात ५७ हजार ४६३ क्युसेक वेगाने पाण्याची आवक सुरू होती.

यंदा धरणात समाधानकारक पाणीसाठा होत असल्याने खरीप हंगामातील पिकांना सिंचनासाठी डावा व उजवा कालवा सुरू करून पाण्याचे आवर्तन देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर जायकवाडी प्रकल्प कालवा सल्लागार समितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी खरीप हंगाम २०२६-२७ साठी नियमानुसार कालव्यांतून पाणी सोडण्याचे आदेश संबंधित पाटबंधारे विभागाला दिले आहेत.

त्यानुसार पैठण पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता गणेश हसे यांनी डावा व उजवा कालवा सुरू करून लाभक्षेत्रातील पैठण, अंबड, घनसावंगी, परतुर, गेवराई तसेच माजलगाव परिसरातील शेतीसाठी सिंचनाचे आवर्तन सुरू करण्याचे नियोजन केले आहे. शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने आणि नियोजनबद्ध वापर करावा, असे आवाहन कार्यकारी अभियंता गणेश हसे यांनी केले आहे. पाटबंधारे विभागाचे अधिकारी व कर्मचारी सिंचन व्यवस्थापनावर लक्ष ठेवून आहेत. गेल्या दोन दिवसांपासून जायकवाडी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरू आहे. बुधवारी रात्रीपासून गुरुवारी दिवसभर झालेल्या पावसामुळे शुक्रवारी धरणात आणखी वेगाने पाण्याची आवक होण्याची शक्यता आहे. धरणातील पाणीसाठा ८५ टक्क्यांपर्यंत पोहोचल्यानंतर गोदावरी नदीपात्रात नियंत्रित स्वरूपात पाण्याचा विसर्ग करण्याबाबत जिल्हा प्रशासन आणि पाटबंधारे विभागाच्या वरिष्ठ स्तरावर निर्णय घेतला जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांकडे लक्ष ठेवावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# रमाई आवास योजनेच्या पहिल्या हप्त्यात वाढ; आता लाभार्थ्यांना मिळणार ५० हजार-पालकमंत्री संजय शिरसाट

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात लाभ वितरण


छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तथा छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने रमाई आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात लाभ वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले. राज्याचे गृहनिर्माण मंत्री अतुल सावे आणि जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते लाभांचे वितरण करण्यात आले.

यावेळी बोलताना पालकमंत्री संजय शिरसाट यांनी रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्त्वाची घोषणा केली. घरबांधणीसाठी पहिल्या टप्प्यात दिला जाणारा २५ हजारांचा हप्ता वाढवून ५० हजार करण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले. केवळ २५ हजारांत घरबांधणीची सुरुवात करणे लाभार्थ्यांसाठी कठीण असल्याने हा निर्णय घेण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

रमाई आवास योजनेतील काही अडचणींमुळे लाभार्थ्यांच्या मनात संभ्रम निर्माण झाला होता. त्यामुळे लाभार्थ्यांची यादी सभागृहाबाहेर लावण्याचे निर्देश देण्यात आले असून प्रशासनाने त्याची तत्काळ अंमलबजावणी केली आहे, असेही त्यांनी सांगितले. तसेच योजनेच्या कामाला अधिक गती देण्यासाठी दर महिन्याच्या १ तारखेला लाभार्थ्यांची अद्ययावत यादी प्रसिद्ध करण्याचे निर्देश प्रशासनाला दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. समाजकल्याण विभागाचे अधिकारीदेखील यापुढे महानगरपालिकेशी समन्वय साधून काम करतील, असेही त्यांनी नमूद केले.

राज्याचे गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, प्रत्येक नागरिकाला स्वतःचे घर मिळावे, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न आहे. त्या दृष्टीने छत्रपती संभाजीनगर कोणत्याही घरकुल योजनेत मागे राहणार नाही, याची दक्षता घेण्यात येईल. रमाई आवास योजनेअंतर्गत लाभ वितरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू केल्याबद्दल त्यांनी महापौर, पदाधिकारी आणि आयुक्त यांचे अभिनंदन केले.

महापौर समीर राजूरकर यांनी आपल्या भाषणात रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी स्वतंत्र समन्वय समिती स्थापन करण्याची गरज व्यक्त केली. ही समिती लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रे, योजनेचे टप्पे आणि प्रक्रियेबाबत योग्य मार्गदर्शन करेल, असे त्यांनी सांगितले. तसेच घरबांधणीचे काम सुरू होताच दुसरा हप्ता तातडीने मिळावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन आणि पारदर्शक पद्धतीने राबविल्याबद्दल त्यांनी प्रशासनाचे कौतुक केले.



मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी प्रास्ताविकात रमाई आवास योजनेअंतर्गत प्रत्येक पात्र लाभार्थ्याला पारदर्शक आणि न्याय्य पद्धतीने लाभ मिळवून देण्यासाठी महानगरपालिका व प्रशासन कटिबद्ध असल्याचे सांगितले. त्यांनी उपस्थित लाभार्थी व मान्यवरांना योजनेची कार्यपद्धती आणि विविध टप्प्यांची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमास उपमहापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, गलिच्छ वस्ती निर्मूलन समितीचे सभापती जालिंदर शेंडगे, नगरसेवक त्र्यंबक तुपे, नगरसेविका हर्षदा शिरसाट, कीर्ती शिंदे, अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील व कल्पिता पिंपळे, माजी महापौर नंदकुमार घोडेले तसेच महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि लाभार्थी मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते.

# मिटमिटा येथील प्रस्तावित झूलॉजिकल पार्कमध्ये ३ हजार वृक्षारोपणाने वृक्षारोपण सप्ताहाची सांगता

छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- हरित महाराष्ट्र अभियानांतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात आलेल्या वृक्षारोपण सप्ताहाची सांगता आज मिटमिटा येथील प्रस्तावित झूलॉजिकल पार्क परिसरात ३ हजार वृक्षारोपण करून करण्यात आली.

यावेळी राज्याचे गृहनिर्माण मंत्री अतुल सावे तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमास महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, गटनेते गणेश लोखंडे, नगरसेवक अब्दुल रशीद खान (मामू), मनपा आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, मुख्य उद्यान अधिकारी डॉ. विजय पाटील, कार्यकारी अभियंता वसंत भोये, तसेच महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



हरित महाराष्ट्र आयोगाच्या संकल्पनेतून राज्यातील वनसंपदा व वृक्षाच्छादन वाढविण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे दि. २२ जुलै ते २९ जुलै २०२६ या कालावधीत वृक्षारोपण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाची सांगता आज झूलॉजिकल पार्क परिसरात ३ हजार वृक्षांची लागवड करून करण्यात आली.

यावेळी मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी गृहनिर्माण मंत्री अतुल सावे व पालकमंत्री संजय शिरसाट यांना प्रस्तावित झूलॉजिकल पार्कच्या आराखड्याची, प्रकल्पाच्या विविध टप्प्यांची तसेच सध्या सुरू असलेल्या विकासकामांची सविस्तर माहिती दिली. यावेळी पार्कच्या उभारणीसंदर्भातील विविध बाबींवर चर्चा करण्यात आली. मान्यवरांनी झूलॉजिकल पार्क हा शहराच्या पर्यावरणीय समतोलासह पर्यटन विकासासाठी महत्त्वाचा प्रकल्प ठरणार असल्याचे सांगत वृक्षसंवर्धनासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

# छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकारण कामाचा आयुक्त जी.श्रीकांत यांच्याकडून आढावा

छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सीएसएमआरडीए) अंतर्गत समाविष्ट ३१३ गावांचा आणि झालर क्षेत्राचा सुनियोजित व सर्वसमावेशक विकास करण्यासाठी प्राधिकरणाच्या पायाभूत सुविधांचा अभ्यास, विश्लेषण, मॅपिंग (जीआयएस) आणि इतर बाबींच्या कामकाजाचा प्राधिकरणाचे आयुक्त तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज आढावा घेतला.



छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यालयातील सभागृहात कामकाज आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी छत्रपती संभाजीनगर प्राधिकरणाचे महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर, महानगर उपायुक्त (प्रशासन) लखीचंद चव्हाण तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्राधिकरण क्षेत्रातील नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देणे आणि नियोजित विकास साध्य करणे हेच प्राधिकरणाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सांगत त्याअनुषंगाने प्राधिकरण कार्यप्रणाली समजावून सांगण्यासाठी प्राधिकरण क्षेत्रातील सर्व गावातील लोकप्रतिनिधी,जिल्हा परिषद, महसूल आणि संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा आयोजित करावी. तसेच संबंधित अधिकारी कर्मचारी यांच्या कर्तव्य व जबाबदारीची निश्चिती करावी अशी सूचना केली. त्याचबरोबर एक ऑगस्ट पासून प्राधिकरणाचे कार्यालयीन कामकाज ई ऑफिस प्रणाली द्वारे सुरू झालेच पाहिजे त्याअनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. तसेच वेरूळ -घृष्णेश्वर मंदिर परिसरातील घनकचरा व्यवस्थापनासाठी कंत्राटदाराची निवड करणे, आपले सरकार पोर्टल वरील तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची निवारण करणे, सात दिवसांपेक्षा अधिक देयके प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घेणे, प्राधिकरण हद्दीतील अनधिकृत मालमत्ता गुंठेवारीसाठी आलेले प्रस्ताव, मंजूर, नामंजूर आणि प्रलंबित प्रस्तावांची माहिती, याबाबतचा आढावाही आयुक्त जी.श्रीकांत यांनी घेतला. तसेच छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयासाठी किमान दोन एकर शासकीय जागा असण्याबाबत पाठपुरावा करण्याची सूचनाही आयुक्त जी. श्रीकांत यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केली. यावेळी त्यांनी मसीआ, क्रेडाई, सीएसएन फर्स्टचे प्रतिनिधी, पदाधिकारी यांच्याही समस्या जाणून घेतल्या.

# जन्म-मृत्यू प्रमाणपत्रासाठी शुल्क तातडीने भरा अन्यथा अर्ज होणार रद्द; सात ऑगस्ट पर्यंत ऑनलाइन शुल्क भरण्याची अंतिम मुदत

छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत नागरिकांना ऑनलाइन पद्धतीने जन्म व मृत्यू प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याची सुविधा सुरू केली असून, या सेवेसाठी अर्ज करूनही शुल्क न भरलेल्या नागरिकांना दि.०७ ऑगस्ट पर्यंत ऑनलाइन शुल्क भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अन्यथा आयुक्त यांच्या आदेशानुसार संबंधित अर्ज रद्द करण्यात येणार असल्याचे आरोग्य विभागाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या ई-गव्हर्नन्स प्रणालीद्वारे जन्म व मृत्यू प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज स्वीकारले जातात. या सेवेसाठी निर्धारित कालमर्यादा सात दिवसांची आहे. अर्जाची पडताळणी झाल्यानंतर अर्जदारांना एसए व ई-मेलद्वारे ऑनलाइन शुल्क भरण्यासाठी पेमेंट लिंक पाठविण्यात येते. शुल्क भरल्यानंतरच संबंधित प्रमाणपत्र ऑनलाइन उपलब्ध करून दिले जाते.

मात्र, अनेक अर्जदारांना पेमेंट लिंक पाठवून ६० दिवसांहून अधिक कालावधी लोटल्यानंतरही त्यांनी शुल्क भरलेले नसल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी, लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत निश्चित कालमर्यादेत सेवा देणे शक्य होत नसून RTS Portal वर मोठ्या प्रमाणात प्रकरणे प्रलंबित राहात आहेत.

यामुळे महानगरपालिकेने अशा सर्व अर्जदारांना हे आवाहन केले आहे की,ङदि .०७ ऑगस्ट २०२६ पर्यंत ऑनलाइन शुल्क भरावे. निर्धारित मुदतीत शुल्क न भरल्यास संबंधित अर्ज कोणतीही पुढील सूचना न देता रद्द करण्यात येतील.

अर्ज रद्द झाल्यास संबंधित नागरिकांना पुन्हा RTS Portal वर जाऊन जन्म अथवा मृत्यू नोंदणीसाठी नवीन अर्ज दाखल करावा लागेल. त्यासाठी आवश्यक माहिती व कागदपत्रे अपलोड करून नव्याने प्रक्रिया पूर्ण करावी लागणार असून त्यानंतरच ऑनलाइन प्रमाणपत्र मिळू शकेल.

दरम्यान, भविष्यात अशा प्रकारची प्रकरणे प्रलंबित राहू नयेत यासाठी महानगरपालिकेने नवीन कार्यपद्धती निश्चित केली आहे. त्यानुसार, नागरिकांनी RTS Portal वर अर्ज दाखल केल्यानंतर संबंधित उपनिबंधक तथा सहाय्यक आयुक्त अर्जाची पडताळणी करून शुल्क भरण्यासाठी पेमेंट लिंक पाठविणार आहेत.

पेमेंट लिंक पाठविल्यानंतर अर्जदाराने शुल्क भरणा केल्यानंतर भरणा केल्याच्या दिनांक पासून सात दिवसाच्या अवधीत प्रमाणपत्र उपलब्ध करून दिले जाईल.

पाठवल्यावर अर्जदाराने निर्धारित कालावधीत शुल्काचा भरणा केल्या नसल्यास अशा अर्जदाराचा अर्ज तात्पुरता निकाली काढण्यात येईल अशा अर्जदारास सदर सेवेचा लाभ घेण्यासाठी पुन्हा अर्ज करणे आवश्यक असेल.करिता संबंधित अर्जदारांनी सदर ऑनलाईन सेवेचा लाभ नियतकाल मर्यादित घेण्यासाठी छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

(पान १ वरुन)

## तुकाराम मुंढेंचे पथक थेट कोर्टाच्याच...

विचारणा करत मंत्रालयासह उच्च न्यायालय, सरकारी आणि निमसरकारी आस्थापनांचीही तातडीने तपासणी करण्याचे आदेश दिले होते.

तुकाराम मुंढे यांनी एफडीएच्या कार्यपद्धतीवर ज्याप्रकारे कोर्टाने प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याबद्दल प्रतिक्रिया दिली होती. एफडीएची कारवाई ही भारतात जो कायदा निर्माण झाला त्यानुसारच महाराष्ट्रात कारवाई होत असल्याचे म्हटलं. तर दुसरीकडे छत्रपती संभाजी नगर मधील प्रयोग शाळेतील अधिकाऱ्यांनी तुकाराम मुंढे यांच्या कार्यपद्धतीवर जे प्रश्न उपस्थित केले आणि त्यांची तक्रार केली यावर तुकाराम मुंढेंनी प्रतिक्रिया दिलेली नाही.

## शिवसेना पक्ष अन् चिन्हाबाबत...

गटाकडून करण्यात आला. तसेच जानेवारी २०२४ मध्ये विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिंदे गटालाच खरी शिवसेना म्हणून मान्यता दिली होती, या निर्णयालाही ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदारांनी केलेल्या बंडामुळे तत्कालीन महाविकास आघाडी सरकार कोसळले होते. त्यानंतर फेब्रुवारी २०२३ मध्ये निवडणूक आयोगाने शिंदे गटाला शिवसेना नाव आणि धनुष्यबाण चिन्ह बहाल केले, तर ठाकरे गटाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) हे नाव आणि मशाल हे चिन्ह दिले. आजच्या सुनावणीत ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयासमोर प्रमुख मागणी केली की, निवडणूक आयोगाचा निर्णय हा लोकशाही मूल्यांच्या विरोधात आहे. त्यामुळे या प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत शिंदे गटाला मिळालेले धनुष्यबाण चिन्ह हे केवळ तात्पुरत्या स्वरूपात वापरण्याची मुभा असल्याचे स्पष्ट करण्यात यावे.

## राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांच्या...

अडचणी निर्माण होऊ शकतात, असा आरोप त्यांनी केला आहे

राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांच्या सिबिल गुणांकनावर विपरीत परिणाम होणार आहे. त्यामुळे क्रांतिकारी शेतकरी संघटनेने या गंभीर प्रश्नाकडे राज्य सरकारचे लक्ष वेधले असून, सरकारने तातडीने सर्व राष्ट्रीयकृत, सहकारी आणि खासगी बँकांना स्पष्ट लेखी आदेश देऊन या योजनेचा शेतकऱ्यांच्या सिबिल स्कोअरवर कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही, याची हमी द्यावी, अशी मागणी केली आहे.

सरकारने या विषयावर तातडीने भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे अन्यथा शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आणि असंतोष वाढण्याची शक्यता आहे. या प्रश्नांवर क्रांतिकारी शेतकरी संघटना पुढील आंदोलनाची दिशा निश्चित करेल असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## अमित शहांनी राजीनामा द्यावा;...

यांनी केले. तसेच, भाजपवर निशाणा साधताना ते म्हणाले की, ‘‘भाजप सध्या देशातील सर्वात जास्त घाबरलेली पार्टी असून, ते आता निश्चितच सत्तेतून बाहेर जाणार आहेत.‘‘

तरुणांच्या आणि विद्यार्थ्यांच्या ताकदीचे कौतुक करताना संजय राऊत यांनी ऐतिहासिक दाखला दिला. ते म्हणाले, ‘‘छत्रपती शिवाजी महाराजही जेव्हा स्वराज्यासाठी लढत होते, तेव्हा ते याच मुलांच्या वयाचे होते. त्यांनी अगदी लहान वयातच अनेक किल्ले जिंकले आणि बलाढ्य औरंगजेबाच्या विरोधात लढा उभा केला. एका अर्थाने, छत्रपती शिवराय हेसुद्धा त्या काळातील झेन-झी होते. असे राऊत म्हणाले.

## नवे शिक्षणमंत्रीही विचित्रच,...

स्वागत आणि कौतुक करत आहेत. प्रधान यांना हटवून सरकारने अजून एक विचित्र माणूस तिथे बसवून ठेवला आहे. हे सरकार बलात्काऱ्यांचे समर्थन करणारे आहे, अशी टीका त्यांनी केली. सध्या झेन झी पिढीला जाणूनबुजून ट्रोल केले जात असल्याचेही ते म्हणाले. आंदोलनांना बाहेरून फंडिंग येत असल्याच्या आरोपांवर बोलताना दिपके यांनी थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनाच लक्ष्य केले. जर आम्हाला खरोखरच बाहेरून फंडिंग येत असेल, तर हे गृहमंत्री अमित शहांचे मोठे अपयश आहे आणि त्यासाठी त्यांनी त्वरित राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. तसेच २० तारखेला विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जचे आदेशही अमित शहांचेच असतील, असा संशय त्यांनी व्यक्त केला. आंदोलनाबाबत बोलताना दिपके यांनी पोलिसांच्या भूमिकेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे केले. त्यांनी आरोप केला की, १९ तारखेच्या रात्री आणि २० च्या सकाळी मी स्वतः पाहिले आहे की, पोलिसांनी दगडांनी भरलेला एक ट्रक आणि आधीच तुटलेली एक व्हॅन तिथे आणून ठेवली होती. दगडफेकीचे प्लॅनिंग पोलिस आणि भाजपने मिळून केले होते. याप्रकरणी आपण थेट डीसीपी यांची भेट घेऊन त्यांना जाब विचारल्याचेही ते म्हणाले. पोलिसांनी संविधानाचे पालन करावे. जर त्यांना भाजपचेच समर्थन करायचे असेल, तर त्यांनी थेट भाजपच्या मुख्यालयासमोर उभे राहून मै भी चौकीदार म्हणावे,‘‘ असा टोला त्यांनी हाणला.